cmyk

## संपादकीय

### महाराष्ट्राच्या राजकारणात

महाराष्ट्रात सध्या निवडणुकांचे वारे वाहत आहेत. विधान परिषद निवडणुकीच्या निमित्ताने राज्यातील राजकीय समीकरणे पुन्हा एकदा बदलताना दिसत आहेत. पहिल्या टप्प्यात महायुतीने स्पष्ट आघाडी घेतली असली, तरी या विजयामागे विरोधकांची कमजोरी अधिक आणि सत्ताधाऱ्यांची ताकद कमी असल्याचे चित्र आहे. महाविकास आघाडीतील उमेदवारांनी माघार घेतल्याने काही जागांवर महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आले.


दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–९७ | शनिवार दि.२७ जून २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### राम मंदिर दानप्रकरण: चंपत राय, अनिल मिश्रा यांचा राजीनामा

अयोध्य: राम मंदिरातील देणग्यांशी संबंधित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात मोठी घडामोड समोर आली आहे. श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे महासचिव चंपत राय आणि ट्रस्टी डॉ. अनिल मिश्रा यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. नैतिक जबाबदारी स्वीकारत त्यांनी हा निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी या प्रकरणात कठोर भूमिका घेतल्यानंतर आणि विशेष तपास पथकाच्या प्राथमिक अहवालानंतर हा निर्णय झाल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. राम मंदिरातील देणग्यांशी संबंधित गैरव्यवहाराच्या तपासात एसआयटीने प्राथमिक अहवाल सादर केला आहे. या अहवालात काही कठोर शिफारसी करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. त्यानंतर तपासाचा वेग वाढवण्यात आला असून, या प्रकरणातील पहिला गुन्हाही यापूर्वीच दाखल करण्यात आला आहे.

### एफडीएचे महिनाभरात ९०४ छापे

मुंबईः महाराष्ट्रात प्रतिबंधित गुटखा, पानमसाला, भेसळयुक्त अन्नपदार्थ तसेच बेकायदेशीर औषध व्यवसायाविरोधात अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) महिनाभरात राज्यव्यापी धडक मोहीम राबवत ९०४ ठिकाणी छापे टाकले. यामध्ये ३४ कोटी ६६ लाख ९० हजार ६२४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून ४५७ जणांना अटक करण्यात आली आहे. ३२२ आस्थापना सील करून ४२ वाहने जप्त करण्यात आली अशी माहिती अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पत्रकार परिषदेत दिली. तुकाराम मुंढे म्हणाले, २५ मे ते २४ जून २०२६ या कालावधीत मुंबई, कोकण, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती आणि नागपूर विभागात या कारवाया करण्यात आल्या. प्रतिबंधित गुटखा व पानमसाला विरोधातील मोहिमेत ४४६ आस्थापनांवर छापे टाकून ५ कोटी ५५ लाख रुपयांचा साठा जप्त करण्यात आला. या प्रकरणांमध्ये ४५७ आरोपींना अटक करण्यात आली.

### एमपीएसी आयोगाने कोणतेही एकतर्फी निर्णय घेऊ नये – मुख्यमंत्री

पुणेः महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएसी) परीक्षा ऑनलाइन घेण्याच्या निर्णायामुळे विद्यार्थ्यांमध्ये अस्वस्थता आहे. मात्र आयोगाने कोणतेही एकतर्फी निर्णय घेऊ नयेत. विद्यार्थ्यांबरोबर व्यापक चर्चा करूनच योग्य तो निर्णय घ्यावा अशी सूचना आयोगाच्या अध्यक्षांना केली आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे शुक्रवारी दिली. दरम्यान या प्रश्न राजकीय नाही. एमपीएसीच्या परीक्षांमध्ये मोठे बदल केले जाणार आहेत. ही स्पर्धा पारदर्शी आणि नियोजित वेळेत व्हावी यासाठी राज्य शासनाचे प्रयत्न आहेत. त्यामुळे या निर्णयावरून खासगी शिकवणी चालकांनी त्यासाठी विद्यार्थ्यांना वेठीस धरू नये असा इशाराही त्यांनी दिला. सारथीच्या वतीने यूपीएससी आणि एमपीएसी मधील यशस्वी विद्यार्थी आणि त्यांच्या पालक सत्कार समारंभात ते बोलत होते. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील महापौर मंजुशा नागपूरे यांच्यासग विविध प्रशासकीय अधिकारी सारथीचे अधिकारी आणि आमदार उपस्थित होते.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.२५ जून २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३७.५० क्विंटल | २,००० | २,४३१ | २,३१८ |
| ज्वारी/हायब्रिड: २३.०० क्विंटल | २,३०१ | ३,००० | २,५८३ |
| मका/लोकल: ४.०० क्विंटल | १,८१० | २,०५० | १,९३० |
| तूर: १.०० क्विंटल | ७,१५० | ७,३०० | ७,२२५ |
| उडीद: ०.५० क्विंटल | ६,५०१ | ६,५०१ | ६,५०१ |
| बाजरी: ३१.०० क्विंटल | २,४०० | २,७५२ | २,५८८ |
| मुग: ४.०० क्विंटल | ७,००१ | ७,००१ | ७,००१ |
| सोयाबीन: १५.०० क्विंटल | ६,६५० | ६,६५० | ६,६५० |
| हरभरा: ३.०० क्विंटल | ५,०१० | ५,०१० | ५,०१० |

## ● सिंचनाच्या पाणीपट्टीत बदल

# ऊस-केळी उत्पादकांवर वाढीव भार, कापूस शेतकऱ्यांना दिलासा

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील सिंचनासाठी धरणांमधून दिल्या जाणाऱ्या पाण्याच्या दरात महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने बदल करत पुढील तीन वर्षांसाठी नवीन पाणीपट्टी दर मंजूर केले आहेत. जून २०२६ ते जुलै २०२९ या कालावधीसाठी लागू होणाऱ्या या नव्या दरांमुळे ऊस, केळी आणि फळबाग उत्पादक शेतकऱ्यांच्या सिंचन खर्चात वाढ होणार आहे. मात्र, कापूस उत्पादकांना काहीसा दिलासा देत पाणीपट्टीत कपात करण्यात आली आहे.**



पाटबंधारे विभागाने शेती, औद्योगिक आणि पिण्याच्या पाण्याच्या वापरावरील शुल्कात वाढ करण्यासाठी प्राधिकरणाकडे प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावावर सुनावणी झाल्यानंतर प्राधिकरणाने सुधारित पाणीपट्टी दरांना मंजुरी दिली. नवीन दरानुसार खरीप हंगामात ऊस आणि केळी पिकांसाठी प्रति हेक्टर पाणीपट्टी २,२६८ रुपयांवरून २,३७५ रुपये करण्यात आली आहे. त्यामुळे या नगदी पिकांचे उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या सिंचन खर्चात वाढ होणार आहे. तसेच फळबागांसाठीही पाणीपट्टी १,७०६ रुपयांवरून १,७८० रुपये प्रति हेक्टर करण्यात आली आहे. परिणामी फळ उत्पादक शेतकऱ्यांनाही वाढीव आर्थिक भार सहन करावा लागणार आहे. दुसरीकडे कापूस उत्पादकांसाठी प्राधिकरणाने दिलासादायक निर्णय घेतला आहे. कापूस पिकावरील पाणीपट्टीत ७० रुपयांची कपात करण्यात आली असून आता प्रति हेक्टर ९०० रुपये शुल्क आकारले जाणार आहे. कापूस, सोयाबीन आणि तूर उत्पादकांना ▶▶ पान २ वर

# विषारी दारूकांडावरून विधानसभेत गदारोळ!

## सरकार असंवेदनशील असल्याचा विरोधकांचा आरोप

मुंबई । प्रतिनिधी

पुण्यातील विषारी दारूकांड प्रकरणावरून विधान परिषदेत गुरुवारी (ता. २५) विरोधकांनी गदारोळ केला. या दुर्घटनेतील मृतांची संख्या आणि प्रशासनाच्या भूमिकेवरून विरोधकांनी टीका करत, सरकार या घटनेबाबत असंवेदनशील असल्याचा आरोप केला. तर, सत्ताधारी सदस्यांनी सरकारने या प्रकरणी कारवाई करून दोषींवर कठोर पावले उचलल्याचे सांगून विरोधक या




प्रकरणाला राजकीय वळण देत असल्याचा आरोप केला. भाजप आ. अमित गोरखे यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून पुणे आणि ▶▶ पान २ वर

# भाजपात ब्राम्हण-मराठा वाद

पुणे । प्रतिनिधी

**पुण्यात सारथी संस्थेच्या वतीने युपीएससी आणि एमपीएससी परीक्षांमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा आणि त्यांच्या पालकांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सुरू असलेल्या या कार्यक्रमात आसन व्यवस्थेवरून राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी आणि आमदार अभिमन्यू पवार यांच्यात वाद निर्माण झाला. या घटनेनंतर मेधा कुलकर्णी प्रसारमाध्यमांशी बोलताना भावूक झाल्या आणि त्यांच्या डोळ्यांत अश्रू आले.**

## अभिमन्यू पवार जातीवरुन बोलले? मेधा कुलकर्णींच्या डोळ्यात पाणी; थेट कार्यक्रमातून निघून गेल्या



मेधा कुलकर्णी यांनी सांगितले की, त्या कार्यक्रमाला सकारात्मक मनाने गेल्या होत्या. अधिकाऱ्यांनी प्रोटोकॉलनुसार पहिल्या रांगेतील जागा खासदारांसाठी राखीव असल्याचे सांगितल्यामुळे त्या जागेवर बसल्या. मात्र, त्यानंतर आसनव्यवस्थेवरून वाद निर्माण झाला. त्यांच्या म्हणण्यानुसार, संबंधित अधिकाऱ्यांनी आमदार अभिमन्यू पवार यांनाही ती जागा खासदारांसाठी राखीव असल्याची माहिती दिली होती. तरीही या मुद्द्यावरून अनावश्यक वाद निर्माण झाला. यानंतर मेधा कुलकर्णींनी गंभीर आरोप करत सांगितले की, ''मराठ्यांच्या कार्यक्रमात तुम्ही पहिल्या रांगेत बसणं योग्य दिसत नाही,'' असे वक्तव्य त्यांच्यासमोर करण्यात आले. ▶▶ पान २ वर

# स्व.विलास घुले व उमेश माने यांच्या न्यायासाठी रस्त्यावर उतरू–धनंजय मुंडे

## निष्पक्ष व सर्व बाजूंनी तपास होण्यासाठी पाठपुरावा करणार–मुंडेंनी घुले कुटुंबाचे केले सांत्वन

केज । प्रतिनिधी

चार दिवसांपूर्वी केज तालुक्यातील टाकळी परिसरात झालेल्या दुर्दैवी हत्याकांडात मृत पावलेल्या स्व. विलास घुले यांच्या कुटुंबियांची शुक्रवारी टाकळी येथे जाऊन माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी भेट घेत त्यांचे सांत्वन केले.

आरोपींनी संगनमत करून सामान्य गरीब कुटुंबातील उमेश माने या तरुणावर आधी जीवघेणा हल्ला केला. त्याला वाचवायला गेलेल्या विकासचा निर्घृण खून करण्यात आला. त्यानंतर न्यायासाठी रस्त्यावर उतरलेल्या कुटुंबियांना विलासच्या मृतदेहासहित तीन दिवस तिष्ठत बसवण्यात आले,



हे क्लेशदायक आणि संतापजनक असल्याचे धनंजय मुंडे यावेळी म्हणाले. या संपूर्ण घटनेच्या तपासासाठी स्वतंत्र एसआयटी समिती स्थापन करण्यात आली असली तरी त्यावर आणि त्यांच्या तपासावर घुले कुटुंबीय समाधानी नाहीत. पीडित उमेश माने व विलासच्या कुटुंबियांना देखील धमकावले ▶▶ पान २ वर

### माध्यमांमधील काहीजणांचा आततायीपणा थांबवा

अशी एखादी दुर्दैवी घटना घडली, तर त्याला ती गुन्हेगारी प्रवृत्ती जबाबदार असते, मात्र त्याआडून संपूर्ण जातीला गुन्हेगार ठरवणे योग्य नाही. तशा आशयाच्या बातम्या जाणीवपूर्वक पेरण्याचे प्रकार काही दिवसांपासून काही ठराविक लोकांनी केले. मात्र गुन्ह्याकडे गुन्हा, गुन्हेगारीकडे वृत्ती म्हणून बघितले पाहिजे, जातींना दूषणे देण्यापेक्षा गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी प्रयत्न होण्याची गरज आहे, असे परखड मत धनंजय मुंडे यांनी यावेळी व्यक्त केले.

# भाविकांच्या देणग्यांवर दरोडा टाकणारे मोदी व आरएसएसचे 'खास' लोक

मुंबई । प्रतिनिधी

## हर्षवर्धन सपकाळ यांचा आरोप, राम मंदिरासाठी दिलेल्या सोने चांदीच्या विटांचा हिशोब द्या

मोघलांनी देशातील मंदिरे लुटली, सोमनाथचे मंदिर मोहमद गझनीने लुटले पण सध्या मंदिर लुटणारे स्वकीयच निघाले. भाजपा व त्यांच्या बगलबच्च्यांनी चक्क मर्यादा पुरुषोत्तम प्रभू रामालाच लुटले आहे. हा सर्व प्रकार तळपायाची आग मस्तकात जाणारा आहे, पण रामाच्या व हिंदूच्या नावावर राजकारण करणारा भाजपा व रा.स्व. संघाचा एकही नेता या दरोड्यावर बोलत नाही. प्रभू रामाला भक्तीभावाने दान–देणग्या देणाऱ्या भाविकांचा हा घोर अपमान आहे. हिंदूंचा अपमान कदापी सहन केला जाणार नाही. भाविकांच्या देणग्यांवर दरोडा टाकणाऱ्या बदमाशांना



कठोरातील कठोर शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.

राम मंदिरातील देणग्यांवर दरोडा टाकणाऱ्या प्रवृत्तींचा समाचार घेत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, अयोध्येतील प्रभू श्री राम मंदिरात भाविकांनी दिलेल्या देणग्यांमध्ये झालेल्या चोरी व पैशाच्या ▶▶ पान २ वर

# उद्धव ठाकरे, देवेंद्र फडणवीसांचा एकाच विमानातून प्रवास; राजकीय चर्चांणा उधान

मुंबई । प्रतिनिधी

राज्याच्या राजकारणात चर्चेला उधाण आणणारी एक महत्त्वाची घटना घडली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि शिवसेना (ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मुंबई ते नागपूर असा एकाच विमानातून प्रवास केला. या प्रवासादरम्यान दोन्ही नेत्यांमध्ये काही वेळ चर्चा झाल्याची माहिती समोर आली असून, त्यामुळे राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे.

या विमानप्रवासात उद्धव ठाकरे यांच्यासोबत आदित्य ठाकरे, संजय राऊत, विनायक राऊत ▶▶ पान २ वर

# नववीच्या समाजशास्त्रातून संविधानाची प्रस्तावना हटवली

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

एनसीईआरटीने नववीच्या सामाजिक विज्ञानच्या पुस्तकातून संविधानाची प्रस्तावना काढून टाकली आहे. याशिवाय सोशलिस्ट (समाजवादी) आणि सेक्युलर (धर्मनिरपेक्ष) या शब्दांचाही उल्लेख नाही. पुस्तकात आणीबाणीवर एक वेगळा विभाग जोडला आहे.




ही माहिती नुकतीच समोर आली. पुस्तकातील 'अंडरस्टँडिंग सोसायटी: इंडिया अँड बियॉन्ड' या प्रकरणात आणीबाणीला लोकशाहीसमोर आलेल्या सर्वात मोठ्या आव्हानांपैकी एक म्हटले आहे. तथापि, यात संविधानाची चर्चा त्याच्या निर्मिती, लोकशाही संस्था आणि मूलभूत अधिकारांच्या माध्यमातून केली आहे, परंतु सार्वभौम (संप्रभुता), 'समाजवादी' (समाजवादी), ▶▶ पान २ वर

# आशा सेविका, कंत्राटी कर्मचाऱ्यांना मिळणार विमा संरक्षण

## महाराष्ट्र सरकारचा मोठा निर्णय

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील आरोग्य सेवेचा कणा मानल्या जाणाऱ्या आशा स्वयंसेविका आणि कमी उत्पन्न असलेल्या कंत्राटी कामगारांसाठी एक आनंदाची बातमी आहे. या कामगारांना आणि त्यांच्या कुटुंबियांना सामाजिक सुरक्षा कवच देण्यासाठी राज्य सरकार राज्य कामगार विमा योजना लागू करण्याच्या तयारीत आहे. महाराष्ट्राचे आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी राज्यातील,आशा कार्यकर्त्या आणि कंत्राटी (एनएचएम)



कामगारांसाठी कर्मचारी राज्य विमा योजनेची व्याप्ती वाढवण्याचा प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले आहेत. या प्रस्तावाचा उद्देश या हजारो कामगारांना आणि त्यांच्या कुटुंबियांना आरोग्य संरक्षण प्रदान करणे हा आहे. मासिक २१,००० ▶▶ पान २ वर

### ● अनेक संघटनांची होती मागणी

राज्य शहरी सहकारी पतसंस्था महासंघ, स्वयंरोजगार संघटना, शिधावाटप कर्मचारी संघटना, सार्वजनिक ग्रंथालये आणि खाजगी शैक्षणिक संस्थांकडून त्यांना कर्मचारी राज्य विमा योजनेत समाविष्ट करण्याची दीर्घकाळापासून मागणी आहे. मंत्री प्रकाश अबिटकर म्हणाले की, आरोग्य विभाग या कमी उत्पन्न असलेल्या कामगारांना ईएसआयएस योजनेचे लाभ देण्याच्या बाजूने आहे. वैद्यकीय खर्चाचा भार कमी करणे आणि अपघात, गंभीर आजार किंवा प्रसूतीच्या प्रसंगी आर्थिक सुरक्षा प्रदान करणे, हा या निर्णयाचा उद्देश आहे. या उपक्रमामुळे राज्यभरातील हजारो आशा कार्यकर्त्या, गट समन्वयक आणि कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळेल.

# आईच्या मदतीने केला भावाचा खून

जालना । प्रतिनिधी

घरगुती वादातून आणि दारूच्याव्यसनाला कंटाळून सख्ख्या भावाने आणि आईनेच मिळून एका ४५ वर्षीय व्यक्तीची लाकडी दांड्याने बेदम मारहाण करून व रात्रभर दोरीने बांधून ठेवून हत्या केल्याची धक्कादायक घटना जालना येथील सुंदरनगर भागात उघडकीस आली आहे. या प्रकरणी चंदनझिरा पोलिसांनी तत्परता दाखवत अवघ्या काही तासांतच दोन्ही आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मृत प्रकाश भगवानराव शिंदे (वय ४५ वर्षे, रा. सुंदरनगर, चंदनझिरा) हा व्यसनाच्या आहारी गेला होता, ज्यामुळे घरात नेहमीच भांडणे होत असत. दि. २४/०६/२०२६ रोजी रात्री २३.०० वाजण्याच्या सुमारास पुन्हा एकदा घरात मोठा वाद झाला. या वादाचे पर्यवसान रागात ▶▶ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# कामराज योजनेची सावली आणि भाजपचे वास्तव

भारतीय राजकारणात दीर्घकाळ सत्तेत राहिल्यानंतर संघटना आणि सरकार दोन्हीमध्ये थकवा निर्माण होण्याची शक्यता नेहमीच चर्चेत असते. ''इंडियन एक्सप्रेस '' मधील अलीकडील मत लेखात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजप संदर्भात अशाच प्रकारच्या ''फॅटिग''चा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे आणि त्यावर उपाय म्हणून १९६३ च्या ''कामराज योजने''सारख्या पुनर्रचनेची कल्पना मांडली आहे. हा प्रस्ताव आकर्षक वाटला तरी त्यामागील वास्तव, राजकीय व्यवहार्यता आणि संघटनात्मक परिणाम यांचे कठोर विश्लेषण आवश्यक आहे.

कामराज योजना ही भारतीय राजकारणातील एक दुर्मिळ घटना होती. १९६३ मध्ये काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि तत्कालीन तमिळनाडूचे मुख्यमंत्री के. कामराज यांनी असा प्रस्ताव दिला की वरिष्ठ केंद्रीय मंत्री आणि काही मुख्यमंत्री यांनी पदाचा राजीनामा देऊन पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी पूर्णवेळ काम करावे. त्या काळात पंडित नेहरू यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसला संघटनात्मक शिथिलता जाणवत होती. अनेक वरिष्ठ नेत्यांनी हा प्रस्ताव स्वीकारून राजीनामे दिले. या घटनेचा उद्देश स्पष्ट होता. सरकारपेक्षा पक्ष संघटना मजबूत करणे. मात्र ही प्रक्रिया पूर्णपणे स्वेच्छेवर आधारित होती आणि त्या काळातील काँग्रेसच्या अंतर्गत रचनेमुळे ती शक्य झाली. आजच्या भाजपसंदर्भात असा ''कामराज मॉडेल'' लागू करणे इतके सोपे नाही. गेल्या दशकात भाजपने अत्यंत केंद्रीकृत नेतृत्व मॉडेल विकसित केले आहे. निर्णय प्रक्रियेत पंतप्रधान मोदी यांचे निर्णायक स्थान आहे, तर पक्ष संघटना आणि सरकार यांच्यातील समन्वय वरपासून खालीपर्यंत नियंत्रित स्वरूपात चालतो. अशा परिस्थितीत मोठ्या प्रमाणावर मंत्र्यांना सरकारमधून काढून पक्ष संघटनेत पाठवणे हे केवळ प्रशासकीय नाही तर राजकीयदृष्ट्या अत्यंत गुंतागुंतीचे पाऊल ठरेल. मतलेखात सूचित केलेला ''फॅटिग'' म्हणजे केवळ व्यक्तींचा थकवा नव्हे, तर संस्थात्मक साचलेपण. दीर्घकाळ सत्तेत राहिल्याने अनेकदा नवे नेतृत्व पुढे येण्याच्या संधी मर्यादित होतात, धोरणात्मक नवकल्पना कमी दिसतात आणि प्रशासकीय यंत्रणा रूटीनवर चालू लागते, हा राजकीय विज्ञानातील सामान्य निरीक्षण आहे. मात्र यावर उपाय म्हणून थेट ''मोठा फेरबदल'' हा एकमेव पर्याय आहे असे म्हणणे अति-सुलभीकरण ठरेल. भाजपच्या संदर्भात आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे संघटनात्मक ताकद. काँग्रेसच्या तुलनेत भाजपची संघटना अधिक शिस्तबद्ध आणि शाखा-आधारित आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी असलेला दीर्घकालीन संबंध पक्षाला अतिरिक्त संघटनात्मक बळ देतो. त्यामुळे ''पक्ष कमजोर झाला आहे म्हणून मंत्र्यांना संघटनेत पाठवा'' हा युक्तिवाद तितका सरळ नाही. अनेक वेळा पक्ष संघटनेचे काम सरकारमधील प्रमुख नेत्यांच्या प्रभावाशिवायही चालते. तथापि, दुसरी बाजू दुर्लक्षित करता येत नाही. केंद्रात आणि राज्यांत दीर्घकाळ सत्तेत राहिल्यानंतर नेतृत्वात नवे चेहरे पुढे आणण्याची गरज निर्माण होते. काही मंत्रालये दीर्घकाळ एकाच चौकटीत राहिल्याने निर्णय प्रक्रियेत लवचिकता कमी होण्याची शक्यता असते. त्यामुळे ''नवीन रक्त'' आणणे हे लोकशाही व्यवस्थेत नेहमीच आवश्यक असते. पण हे काम अचानक ''कामराज योजनेसारख्या'' मोठ्या राजीनाम्यांद्वारे करणे राजकीय अस्थिरता निर्माण करू शकते.

२०२४ नंतरच्या राजकीय परिस्थितीत भाजप एका वेगळ्या टप्प्यावर आहे. लोकसभा निवडणुकांमध्ये स्पष्ट बहुमत असले तरी काही राज्यांमध्ये स्पर्धा वाढली आहे. अशा वेळी मोठ्या प्रमाणावर मंत्रिमंडळ बदल केल्यास प्रशासनिक सातत्यावर परिणाम होऊ शकतो. विशेषतः अर्थ, गृह, परराष्ट्र यांसारख्या संवेदनशील मंत्रालयांमध्ये वारंवार बदल करणे धोरणात्मक संदेश कमजोर करू शकते. या पार्श्वभूमीवर, कामराज योजनेची कल्पना ही प्रेरणादायी असली तरी ती आजच्या परिस्थितीत तशीच लागू करणे व्यवहार्य नाही. योग्य पर्याय म्हणजे टप्प्याटप्प्याने पुनर्रचना. जिथे काही वरिष्ठ नेत्यांना पक्ष संघटनेत अधिक सक्रिय भूमिका दिली जाते आणि नव्या नेतृत्वाला सरकारमध्ये संधी दिली जाते. हे बदल स्थिरता राखून केले गेले तरच त्याचा सकारात्मक परिणाम दिसू शकतो. शेवटी, कोणत्याही राजकीय व्यवस्थेत ''थकवा'' हा अपरिहार्य घटक असतो, परंतु त्यावर उपायही तितकाच संतुलित असावा लागतो. केवळ ऐतिहासिक उदाहरणांवर आधारित मोठे प्रयोग करणे हे आकर्षक वाटले तरी वास्तव राजकारणात त्याची किंमत जास्त असू शकते. कामराज योजना ही त्या काळाची गरज होती; आजची राजकीय परिस्थिती वेगळी आहे. त्यामुळे भाजपसाठीही उत्तर हे पूर्णपणे नक्कल नसून समकालीन गरजांनुसार विकसित केलेले असावे, हाच वास्तववादी निष्कर्ष ठरतो.

## सरपंचाकडून नियम धाब्यावर नदीपात्रात बेकायदा विहीर खोदली

**बीड । प्रतिनिधी**

**अंबाजोगाई तालुक्यातील श्रीपतरायवाडी येथे नदीपात्रात बेकायदेशीरपणे विहीर खोदण्यात आल्याचा गंभीर आरोप करत शेतकरी तुकाराम ईराप्पा माने व रेखा अशोक माने-कवडे यांनी जिल्हा प्रशासन, पोलीस आणि संबंधित विभागांकडे तक्रार दाखल केली आहे. तसेच जीवितास धोका असल्याचा दावा करत पोलीस संरक्षणाचीही मागणी करण्यात आली आहे.**



तक्रारीनुसार, गावच्या सरपंच सुमनबाई पवार यांचे पुत्र गोवर्धन मनोहर पवार व रामधन मनोहर पवार यांनी नदीच्या मुख्य भोवऱ्यात कोणतीही आवश्यक शासकीय परवानगी न घेता विहीर खोदली आहे. यामुळे नदीपात्राचे नुकसान होण्याबरोबरच शेजारील शेतजमिनी धोक्यात आल्याचा आरोप अर्जदारांनी केला आहे. अर्जदारांच्या म्हणण्यानुसार, नदीपात्रात विहीर खोदण्यासाठी ग्रामपंचायत, तहसील कार्यालय, जलसंपदा विभाग, पाटबंधारे विभाग तसेच जिल्हाधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी आवश्यक असते. मात्र, कोणतीही परवानगी न घेता हे काम करण्यात आले असून भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम, २००९ च्या तरतुदींचे उल्लंघन झाल्याचा दावा त्यांनी केला आहे. तुकाराम माने यांनी सांगितले की, त्यांच्याकडे सुमारे ३.७५ एकर जमीन असून यापूर्वीही त्यांच्या जमिनीवर अतिक्रमण झाल्याचा आरोप आहे. आता नदीपात्रातील विहिरीमुळे पावसाळ्यात पुराच्या पाण्याने सुमारे अर्धा एकर जमीन वाहून जाण्याची भीती त्यांनी व्यक्त केली आहे. स्वतः अर्धांगवायूने त्रस्त असल्याने आणि अल्पभूधारक शेतकरी असल्याने प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी त्यांनी विनंती केली आहे. तक्रारीत संबंधितांकडून धमकावण्यात आल्याचाही आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे स्वतःला आणि कुटुंबाला जीविताचा धोका असल्याचे सांगत पोलीस संरक्षण देण्याची मागणी अर्जदारांनी पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी आणि ग्रामीण पोलीस ठाण्याकडे केली आहे. दरम्यान, अर्जदारांनी संबंधित विहिरीचे काम तात्काळ थांबवून संपूर्ण प्रकरणाची चौकशी करावी तसेच आवश्यक असल्यास सदर विहीर शासनाच्या ताब्यात घ्यावी, अशी मागणी जिल्हाधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी आणि तहसीलदार यांच्याकडे केली आहे.

## वीज ग्राहकांची परवानगी नसतांना विद्युत मिटर बदलले तर चोरीचा गुन्हा दाखल करा - राजेशकुमार जोगदंड

**बीड । प्रतिनिधी**



**महाराष्ट्र राज्यात सध्या सत्ताधाऱ्यां कडुन मनमानी सुरु असुन मतदार राजाची मानसिक आणी आर्थिक पिळवणुक करण्याचे षडयंत्र वर्षानुवर्ष सुरु आहे , हेच षडयंत्र नेस्तनाबुत करण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांनी चंग बांधला आहे . त्याचाच एक भाग म्हणुन विद्युत वीज मिटर जबरदस्तीने बदलण्याचा घाट हाणुन पाडण्यात येत आहे.**

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार विद्युत विज मिटर जर ना दुरुस्त नसेल तर त्याला बदलण्याची आवश्यकता नाही आणी तरीही मिटर बदलायचे असेल तर त्या विद्युत विज मिटर मालक ग्राहकांचे ना हरकत प्रमाणपत्र घेतले पाहिजे , असे असतांना महाराष्ट्र राज्यातील जिल्हा , तालुका व शहरी ग्रामीण भागात घरांबाहेरील विद्युत स्मार्ट मिटर बदलण्याचे जबरदस्तीने काम सुरु आहे या मनस्तापां पासुन न्याय मिळण्यांच्या दृष्टीने ज्यांचे मिटर पुर्व परवानगी शिवाय बदलण्यात आले आहे त्या विद्युत मिटर ग्राहकांनी विद्युत मिटर चोरी गेल्याची संबंधित पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करावी , तक्रारी मध्ये मिटर बदलणाऱ्यांचे संशयानुरुप नाव द्यावे . वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या आवाहनानुसार बीड जिल्ह्यातील ज्या ग्राहकांचे पुर्व परवानगी शिवाय विद्युत वीज मिटर बदलण्यात आले आहे किंवा बदलण्याची शक्यता आहे त्या ग्राहकांना न्याय मिळवुन देण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे माजी जिल्हा प्रसिद्धी प्रमुख राजेशकुमार जोगदंड बशीरगंज बीड यांच्या भ्रमणध्वनी क्रमांक ९४०३९१०६३४ वर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## ऑनलाइन महादेव ॲप जुगारावर पोलिसांचा छापा; ८ आरोपींना अटक, ८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**केज । प्रतिनिधी**

**शहरात विनापरवाना सुरू असलेल्या ऑनलाइन जुगारावर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे लोटस्? ३६५. ( ३६५) नावाच्या ऑनलाइन जुगार ॲपच्या माध्यमातून लोकांना जास्त पैसे मिळवून देण्याचे आमिष दाखवत जुगार खेळणाऱ्या व खेळविणाऱ्या ८ जणांवर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.**



पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अपर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई चेतना तिडके आणि सहायक पोलीस अधीक्षक केज वेंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने ही कारवाई केली. मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, दिनांक २५ जून २०२६ रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास केज पोलीस ठाणे हद्दीत ३६५ ऑनलाइन जुगार चालवला जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर विशेष पथकाने छापा टाकून आरोपींना ताब्यात घेतले. या कारवाईत आरोपी अनंत नवनाथ खंदारे (रा. कारेगव्हाण, बीड),अक्षय अनिल गायकवाड (रा. पुणे),अनिल कबीर सानप (रा. बीड) आसाराम बळीराम केकाण (रा. दरडवाडी, केज) गणेश लक्ष्मण खंदारे (रा. कारेगव्हाण),हर्षल मनोहर खंडारे (रा. अमरावती),सुशील दत्तात्रय मुंडे (रा. वडवणी),विशाल उत्तम बारवाळ (रा. छत्रपती संभाजीनगर),यांच्यावर महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यानुसार केज पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३९७/२०२६ दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी कारवाईदरम्यान विविध कंपन्यांचे ३४ मोबाईल, ४ दुचाकी आणि इतर साहित्य असा एकूण ८ लाख १४ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, सहाय्यक पोलीस अधीक्षक वेंकटराम यांच्या मार्गदर्शना खाली ग्रे.पो.उप.नि अमीरोद्दीन इनामदार, धोंडीराम योगीराज मोरे, राजु वंजारे, विशाल क्षिरसागर, अनिल मंदे, मिसबा इनामदार,मल्लीकार्जुन माने, जरगर, मयुर टकले या विशेष पथकातील कर्मचाऱ्यांनी केली आहे.

## पान १ वरून...

### ऊस-केळी उत्पादकांवर वाढीव भार

वाढत्या उत्पादन खर्चाचा सामना करावा लागत असताना हा निर्णय काही प्रमाणात दिलासादायक ठरेल, अशी प्रतिक्रिया शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे. प्राधिकरणाच्या आदेशानुसार रब्बी हंगामासाठी पाणीपट्टीचे दर खरीप हंगामाच्या दुप्पट, तर उन्हाळी हंगामासाठी तिप्पट आकारले जाणार आहेत. त्यामुळे वर्षभर सिंचनावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांच्या खर्चात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. दरम्यान, पाणीपट्टी वाढीच्या निर्णयावर विविध शेतकरी संघटनांनी नाराजी व्यक्त केली आहे. खत, बियाणे, मजुरी, वीज आणि इतर निविष्ठांच्या किमती सातत्याने वाढत असताना शेतीमालाला अपेक्षित भाव मिळत नाही. अशा परिस्थितीत सिंचनाच्या पाणीपट्टीत वाढ करणे शेतकऱ्यांवर अतिरिक्त आर्थिक ओझे टाकणारे असल्याची टीका संघटनांनी केली आहे.ङ्गनवीन पाणीपट्टी दरांचा परिणाम आगामी खरीप, रब्बी आणि उन्हाळी हंगामात राज्यातील लाखो सिंचनधारक शेतकऱ्यांवर होणार असून, विशेषतः ऊस, केळी आणि फळबाग उत्पादकांच्या उत्पादन खर्चात वाढ होणार आहे. तर कापूस उत्पादकांना मिळालेली शुल्क कपात हा एकमेव दिलासादायक निर्णय मानला जात आहे.

------------

### भाजपात ब्राम्हण-मराठा वाद

या वक्तव्यामुळे जातीचा मुद्दा विनाकारण पुढे आणण्यात आल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. ''खुर्च्यांना कधी जात नसते. कार्यक्रमात आसनव्यवस्था प्रोटोकॉलनुसार ठरवली जाते. मग या प्रकरणात जातीचा विषय आणण्याची गरज काय होती?'' असा सवालही त्यांनी उपस्थित केला. मेधा कुलकर्णी यांनी यापूर्वीच्या एका प्रसंगाची आठवण करून देताना सांगितले की, विधानसभा निवडणुकीच्या काळात ब्राह्मण समाजाशी संवाद साधण्यासाठी अभिमन्यू पवार यांनी स्वतः त्यांना निमंत्रित केले होते. त्या वेळी प्रकृती ठीक नसतानाही त्या कार्यक्रमाला गेल्या होत्या. ''मग जातीचा मुद्दा उपस्थित करून नेमके काय साध्य करायचे आहे?'' असा प्रश्न त्यांनी विचारला. यावेळी त्यांनी आणखी एक गंभीर आरोप केला. कार्यक्रमानंतर लाउंजमध्ये जाण्यापासूनही आपल्याला रोखण्यात आल्याचा दावा करत, अभिमन्यू पवार यांनी पोलिस अधिकाऱ्यांना त्याबाबत सूचना दिल्याचा आरोप त्यांनी केला. ''अभिमन्यू पवार अजूनही मुख्यमंत्री कार्यालयातील अधिकाऱ्यासारखे वागत आहेत का?'' असा सवालही त्यांनी उपस्थित केला. ''तुम्ही बसलात तर वाद होईल, या वाक्याचा नेमका अर्थ काय घ्यायचा?'' असा प्रश्न विचारत मेधा कुलकर्णी म्हणाल्या, ''मी माझ्या वरिष्ठांशी चर्चा केली आणि त्यानंतर शांतपणे कार्यक्रमातून बाहेर पडले. मी शपथपूर्वक सांगते की, मी जे बोलत आहे ते सत्य आहे.'' या संपूर्ण घटनेनंतर कार्यक्रमात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. मेधा कुलकर्णी हा कार्यक्रम अर्धवट सोडून निघून गेल्या.

------------

### विषारी दारूकांडावरून

पिंपरी-चिंचवड शहरातील विविध भागांत विषारी दारूमुळे मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत देण्याची मागणी सरकारकडे केली. या लक्षवेधीवरील चर्चेदरम्यान शिवसेना आमदार सचिन अहिर, अंबादास दानवे, अनिल परब आदी विरोधी सदस्यांनी या दारूकांडातील काही मृत व्यक्तींचे अंत्यसंस्कार शवविच्छेदनाशिवाय झाल्याने प्रत्यक्ष मृतांचा आकडा अधिक असू शकतो, असा मुद्दा उपस्थित केला. हडपसर, दापोडी, बोपोडी आणि फुगेवाडी परिसरांत अवैध दारूविक्रीचे अड्डे वर्षानुवर्षे सुरू असल्याचे सांगून त्यांनी वरिष्ठ पोलिस व राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली. तसेच या प्रकरणातील मुख्य सूत्रधार योगेश वानखेडे, राधेश्याम प्रजापती आणि इतर आरोपींवर केवळ उत्पादन शुल्क कायद्यानुसार नव्हे, तर सदोष मनुष्यवधासह भारतीय न्याय संहितेअंतर्गत कठोर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली. भिवंडीहून २१५ लिटर मिथेनॉल पुण्यात कसे पोहोचले, याचीही सखोल चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली. यावर उत्तर देताना गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी सरकारने कोणालाही पाठीशी घातले नसल्याचे स्पष्ट केले. या प्रकरणात वरिष्ठ पोलिस निरीक्षक, सहाय्यक पोलिस निरीक्षक, पोलिस उपनिरीक्षक तसेच उत्पादन शुल्क विभागातील निरीक्षक आणि दुय्यम निरीक्षकांसह अनेक अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. सर्व आरोपींवर सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करण्यात आले असून, तपास सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले. दरम्यान, शिवसेना आमदार सचिन अहिर यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री किंवा पालकमंत्र्यांनी अद्याप मृतांच्या कुटुंबीयांची भेट घेतली नसल्याचा मुद्दा उपस्थित करत सरकार या घटनेबाबत गंभीर नसल्याचा आरोप केला. त्यावर मंत्री कदम यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणी सीआयडी चौकशीचे आदेश देऊन संवेदनशीलता दाखवली असल्याचा दावा केला. मात्र त्या उत्तरावर समाधान न झालेल्या विरोधकांनी सभागृहात गोंधळ घालण्यास सुरुवात केली. मंत्री उदय सामंत यांनी हस्तक्षेप करत सरकारच्या वतीने सत्ताधारी आमदार, पालकमंत्री आणि गिरीश महाजन यांनी भेट दिल्याचे सांगितले. तसेच ''विरोधी शिवसेनेचे प्रतिनिधी म्हणून सचिन अहिर यांनी मृतांच्या कुटुंबीयांना भेट दिल्यानंतर शिवसेना पक्षप्रमुख आणि युवासेना प्रमुख यांनी घटनास्थळी का भेट दिली नाही,'' असा प्रश्न आम्ही विचारायचा का, असा सवाल सामंत यांनी केला. त्यावर अहिर यांनी आक्रमक भूमिका घेत, ''हा सरकारचा विषय असून येथे ठाकरे यांचा काय संबंध?'' असा सवाल केला. अखेर सभापती राम शिंदे यांनी भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी सरकारने उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली.

------------

### भाविकांच्या देणग्यांवर दरोडा टाकणारे

अफरातफरी प्रकरणात चौकशीदरम्यान राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे प्रमुख चंपत राय आणि विश्वस्त अनिल मिश्रा यांनी राजीनामा दिला. पण या प्रकरणी त्यांच्यावर गुन्हा दाखल केला नाही किंवा त्यांना अटकही केली नाही. या प्रकरणी मुख्य आरोपींना सोडून इतर आठ छोट्या कर्मचाऱ्यांवर चोरी आणि कट रचल्या प्रकरणी गुन्हे दाखल झालेले असून त्यांना अटक करण्यात आली आहे. मुख्य सुत्रधारांना मोकाट सोडून मोदी सरकार ''चोर सोडून संन्यासाला फाशी'' देण्याच्या प्रयत्न करत असल्याची टीकाही यावेळी केली. हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, राम मंदिर ट्रस्टचे प्रमुख विश्वस्त चंपत राय यांचे लागेबांधे थेट राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी आहेत, परंतु त्यांनाच मोकळे सोडून अटक केलेल्यांमध्ये दान मोजणी करणारे कर्मचारी, मोजणी प्रक्रियेचे प्रमुख, प्रक्रियेवर देखरेख करणारे निवृत्त बँकर आणि राम मंदिर ट्रस्टचे मुख्य विश्वस्त चंपत राय यांचे चालक व विश्वासू रामाशंकर यादव (उर्फ 'तिन्नू') यांचा समावेश आहे. घोटाळा करणारे निकटवर्तीय मोकाट आणि कर्मचाऱ्यांना अटक हे म्हणजे ''मोदी है तो मुमकीन है!'' असा प्रकार असल्याची खोचक टीका केली. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, देशभरातील अनेक भाविक भक्तांनी राम मंदिराच्या उभारणीसाठी सोने आणि चांदीच्या विटा, हिऱ्याचे दागिने चंपत राय यांच्याकडे दिल्याचे लोक आता समोर येऊन सांगत आहेत. सिंधी समाजाने २०० किलो चांदीच्या विटा दिल्या आहेत. पण त्यांना साधी पावतीही मिळाली नाही. रामाच्या नावाने लोकांनी श्रध्देपोटी दिलेल्या शेकडो, हजारो कोटी रुपयांची रोख रक्कम, दागिने, सोने-चांदीच्या विटा, हिऱ्याचे हार, दागिने याचा कोणताही हिशोब ट्रस्ट सार्वजनिक करत नाही, त्यामुळे या घोटाळ्याची व्याप्ती खूप मोठी आहे असे दिसते. राम मंदिर ट्रस्टचे सर्व विश्वस्त हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अत्यंत जवळचे व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपाशी संबंधित आहेत. त्यामुळेच या घोटाळेबाजांवर अद्याप कारवाई केली जात नाही. शेवटी बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, असंख्य रामभक्तांच्या भावना दुखावणाऱ्या या घोटाळ्याप्रकरणी कलम ३०६, ३१६(५), ३१७(४), ३१७(५), ६१ आणि ३(५) नुसार सौम्य गुन्ह्यांचा एफआयआर दाखल झालेला आहे. वास्तविक पाहता सुप्रीम कोर्टाच्या देखरेखीखाली सदर प्रकरणाचा तटस्थ आणि निष्पक्ष तपास झाला पाहिजे. मोदी सरकारमध्ये थोडी जरी नैतिकता शिल्लक असेल तरी त्यांनी ताबडतोब सदर चौकशी लावावी, तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने ताबडतोब नोंदणी करून त्यांचा अंकेक्षण अहवाल देखील जाहीररित्या प्रकाशित करावा अशी मागणीही यावेळी केली.

----------

### स्व.विलास घुले व उमेश माने यांच्या

जात असून, वेगवेगळ्या केसेसमध्ये गुंतवण्याचे प्रयत्न करण्यात येत असल्याचे कुटुंबियांनी यावेळी सांगितले. याबाबत पोलिसांना निवेदनाद्वारे माहिती देण्यात आली असून, असे प्रयत्न दुर्दैवी असल्याचे धनंजय मुंडे म्हणाले. एकूण तपासात पोलिस यंत्रणेमार्फत कोणाला वाचवण्याचा प्रयत्न होतोय का? जाती - पातीच्या भिंती ओलांडून निष्पक्ष तपास केला जाईल का? याबाबत शंका असून, आवश्यकतेनुसार मी पुन्हा याबाबत सभागृहात बोलेन, असेही मुंडे माध्यमांशी बोलताना म्हणाले. कुणाला मुद्दाम अमुक गुन्ह्यात अडकवा, अशी माझी अजिबात भूमिका नाही. मात्र सर्व साक्षीदार, वस्तुस्थिती, डंप डेटा अशा सगळ्या गोष्टी तपासून योग्य तपास व्हावा, ही अपेक्षा आहे. यामध्ये पोलिस यंत्रणा कमी पडल्या तर घुले आणि माने यांच्या न्यायासाठी प्रसंगी रस्त्यावर उतरावे लागेल, असेही धनंजय मुंडे म्हणाले.

**इतका संताप का?**

जाती जातीचे राजकारण सोडून न्यायाच्या लढाईत आपण आपल्या एका बांधवासाठी सहभागी होतोय. उमेश मानेला वाचवायला गेलेल्या विलासचा खून झाला. यात जातीचे राजकारण कुठून आले? आम्ही न्यायासाठी लढायचे नाही का? फक्त तुम्हालाच न्याय हवा इतर लोकांनी न्याय मागायचा नाही का, असा संतप्त सवाल धनंजय मुंडे यांनी उपस्थित केला.

------------

### नववीच्या समाजशास्त्रातून संविधानाची

'धर्मनिरपेक्ष' (पंथनिरपेक्ष/धर्मनिरपेक्ष), 'लोकशाही' (लोकतांत्रिक) आणि 'गणराज्य' (गणराज्य) यांसारख्या शब्दांबद्दल माहिती दिलेली नाही. ९ वीच्या पुस्तकात लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या भूमिकेचेही सविस्तर वर्णन केले आहे. यात म्हटले आहे की, त्यांनी विद्यार्थी आणि सामान्य लोकांना संघटित केले आणि बिहार तसेच गुजरातमध्ये मोठी जनआंदोलने उभी राहिली. पुस्तकानुसार, १९७७ मध्ये आणीबाणी संपल्यानंतर सार्वत्रिक निवडणुका घेण्यात आल्या. जनतेने मतदानाच्या माध्यमातून आपले मत व्यक्त केले आणि सत्ताधारी सरकार निवडणूक हरले. पुस्तकात याला भारतीय लोकशाहीच्या बळकटीचे उदाहरण म्हटले आहे. पुस्तकात लिहिले आहे की, १९७० च्या दशकाच्या सुरुवातीला इंदिरा गांधी सरकारच्या विरोधात लोकांमध्ये नाराजी वाढत होती. बेरोजगारी, महागाई आणि गैरव्यवस्थापनाच्या आरोपांमुळे अनेक ठिकाणी निदर्शने झाली. त्यानंतर जून १९७५ मध्ये अंतर्गत अशांततेच्या आधारावर राष्ट्रीय आणीबाणी लागू करण्यात आली. पुस्तकानुसार, या काळात बहुतेक मूलभूत अधिकार निलंबित करण्यात आले, प्रेसवर सेन्सॉरशिप लादण्यात आली आणि अनेक राजकीय नेते व कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली. पुस्तकात म्हटले आहे की, या काळात लोकशाही संस्थांवर दबाव वाढला आणि लोकांचे स्वातंत्र्य मर्यादित झाले.

------------

### उद्धव ठाकरे, देवेंद्र फडणवीसांचा एकाच

आणि अनिल देसाई हेही उपस्थित होते. आदित्य ठाकरे हे उद्धव ठाकरे यांच्या शेजारी बसले होते, तर संजय राऊत आणि अनिल देसाई मागील सीटवर असल्याचे पाहायला मिळाले. माहितीनुसार, विमानात भेट झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांना ''आपण भेटलो, हीच मोठी बातमी आहे,'' असे मिश्कीलपणे म्हटले. त्यानंतर दोन्ही नेत्यांमध्ये एकमेकांची विचारपूस झाली. तसेच देवेंद्र फडणवीस आणि खासदार संजय राऊत यांच्यामध्येही काही वेळ संवाद झाल्याचे सांगितले जात आहे. अलीकडेच शिवसेना (ठाकरे गट) मधील सहा खासदारांनी शिंदे गटात प्रवेश केल्यामुळे राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांनी बंडखोर खासदारांच्या मतदारसंघांचा दौरा करण्याचा निर्णय घेतला आहे. याच दौऱ्याचा भाग म्हणून २७ जून रोजी उद्धव ठाकरे यांचा यवतमाळ-वाशीम दौरा असून, त्यासाठी ते नागपूरला जात होते. योगायोगाने त्याच विमानात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही प्रवास करत असल्याने या भेटीची राज्यभर चर्चा रंगली आहे. उद्धव ठाकरे यांच्या अनपेक्षित भेटीनंतर राजकीय चर्चांना उधाण आले असले, तरी या भेटीत कोणत्याही राजकीय विषयावर सविस्तर चर्चा झाल्याची अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

--------------

### आईच्या मदतीने

होऊन मृत प्रकाश याचा लहान भाऊ दीपक भगवानराव शिंदे आणि आई शांताबाई भगवानराव शिंदे यांनी प्रकाश याला लाकडी दांड्याने बेदम मारहाण केली. एवढेच नव्हे तर, त्याला रात्रभर दोरीने घट्ट बांधून ठेवले, ज्यामध्ये त्याचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर मृत प्रकाश शिंदे यांच्या पत्नी रंजना प्रकाश शिंदे यांनी चंदनझिरा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यांच्या तक्रारीवरून आरोपींविरुद्ध पोलीस ठाणे चंदनझिरा येथे गुरनं. ४१८/२०२६, भारतीय न्याय संहिता () कलम १०३ (१) (खून), ११५ (२) व इतर कलमांन्वये खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. दि. २५/०६/२०२६ रोजी अधिकृतपणे अटक करून न्यायालयापुढे हजर केले आहे. गुरंन- ४१८/२०२६, भारतीय न्याय संहिता () कलम १०३ (१) (खून), ११५(२) व इतर कलमांन्वये खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई मा. श्री. तेघबीर सिंह संधु पोलीस अधीक्षक , मा. विक्रम साळी, अपर पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली चंदनझिरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. बाळासाहेब पवार यांच्या नेतृत्वात पोउपनि रवि देशमाने, पोउपनि सय्यद अफसर सय्यद हुसेन, ए.एस.आय. राजेंद्र ठाकूर, पोलीस अंमलदार संतोष वनवे, कृष्णा तंगे, रवी देशमुख, विशाल लोखंडे, राजेंद्र पवार, अभिजीत वायकोस, सागर खैरे, राहुल जोधळे, शिवाजी जोंधळे, गणेश नाईकवाडे, मपोकों सखु शिंदे आणि चालक संग्राम ठाकूर, सुभाष नागरे यांच्या पथकाने केली आहे.

------------

### आशा सेविका, कंत्राटी कर्मचाऱ्यांना

रुपयांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या विविध प्रकारच्या कामगारांना ईएसआयएस योजनेचा लाभ देण्याबाबत चर्चा करण्यासाठी मंत्रालयातील आरोग्य मंत्र्यांच्या समिती कक्षात एक महत्त्वाची बैठक झाली. या योजनेचा लाभ आशा स्वयंसेवक, गट समन्वयक, आरोग्य विभागाचे कंत्राटी कर्मचारी, पतसंस्था कर्मचारी, शिधावाटप दुकान कर्मचारी, खाजगी शाळा कर्मचारी, स्वयंरोजगार संस्था कर्मचारी आणि ग्रंथालय कर्मचारी यांना मिळेल. या बैठकीला आरोग्य विभागाचे सचिव ई.रविंद्रन, ईएसआयएस आयुक्त रमेश चव्हाण, राष्ट्रीय आरोग्य मिशनचे संचालक आणि आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर, अतिरिक्त आयुक्त डॉ. सुनील भोकर, आरोग्य सेवा संचालक डॉ. विजय कांडेवाड आणि ईएसआयएस संचालक सोहम वायल उपस्थित होते. महाराष्ट्रात अंदाजे ८४,००० आशा कार्यकर्त्या कार्यरत आहेत आणि आरोग्य विभागाच्या विविध योजना व उपक्रमांची जनतेपर्यंत प्रभावीपणे माहिती पोहोचवण्यात त्यांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियान आणि आपत्कालीन वैद्यकीय सेवा (१०८/१०२) अंतर्गत काम करणारे कर्मचारीदेखील आरोग्य कार्यक्रमांच्या योग्य अंमलबजावणीत महत्त्वपूर्ण योगदान देतात. ते कंत्राटी कामगार असल्यामुळे, त्यांना नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे समान सामाजिक सुरक्षा लाभ मिळत नाहीत. आरोग्य मंत्री प्रकाश अबितकर यांनी अशा सर्व कर्मचाऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना आरोग्य सुरक्षेची खात्री करण्यासाठी ईएसआयएसच्या कक्षेत आणण्याकरिता एक सकारात्मक प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले.

-----------


### जाहीरनामा

#### जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत

जन्म आणि मृत्यूची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ (३) अन्वये

सर्व जनतेस मौजे जामगाव ता.आष्टी जि.बीड यांना जाहीर केले आहे की, अर्जदार नामे तुषार शांतीलाल गरसुळे रा.नागलवाडी ता.कर्जत जि.अ.नगर यांनी त्यांचे नामे ओमकार तुषार गरसुळे ता.आष्टी जि.बीड यांचा जन्म/मृत्यू दि.०२/०४/२०२२ रोजी मौजे जामगाव ता.आष्टी जि.बीड येथे झशला असून अर्जदारास सदरहू जन्म/मृत्यूची कायदेशी नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करीता सदरहू अर्जदारा यांचा मुलगा यांचे कायदेशीर जन्म मृत्यू दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिद्धी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहू अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू जन्म/मृत्यू नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.२५/०६/२०२६ रोजी माझे सही व शिक्कयानिशी दिले.

**स्वाक्षरित/-**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसिलदार, आष्टी**

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार, दि. २७ जून २०२६


## थोडक्यात



### राजश्री शाहू महाराजांच्या विचाराची समाजाला आज गरज प्राचार्य डॉ.कदम

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राजश्री शाहू महाराज यांचा जन्मदिवस सामाजिक न्याय दिन म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सदाशिवराव सरकटे प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शक प्राचार्य डॉ विश्वास कदम हे उपस्थित होते या कार्यक्रमाचे मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ विश्वास कदम यांनी राजश्री शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन राजश्री शाहू महाराज यांच्या सामाजिक विचारांची समाजाला गरज असल्याचे प्रतिपादन केले अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ सदाशिव सरकटे यांनी केला त्यांनी आपल्या मनोगत राजश्री शाहू महाराज यांनी समाज व्यवस्थेत सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचे मोलाचे कार्य केल्याचे मनोगत व्यक्त केले या कार्यक्रमासाठी प्रा सोमनाथ घाडगे सर कार्यक्रमाधिकारी प्रा डॉ लोखंडे यांनी या कार्यक्रमाचे संचलन केले तर आभार प्रा सोमनाथ घाडगे यांनी मानले या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विद्यार्थी प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे स्वीकारण्यासाठी दत्ता चादर यांनी परिश्रम घेतले

### मुंबईतील उपवर्गीकरण विरोधी विराट महामोर्चात सहभागी व्हा – विजय साळवे

माजलगाव । प्रतिनिधी

अनुसूचित जातींच्या घटनादत्त आरक्षणावर गदा आणणाऱ्या उपवर्गीकरण निर्णयाच्या विरोधात दि. ३० जून २०२६ रोजी मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या विराट महामोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन रिपब्लिकन सेनेचे मराठवाडा समन्वयक विजय साळवे यांनी केले आहे.



विजय साळवे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, सर सेनानी आनंदराज यशवंतराव आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली विधानभवन मंत्रालय, मुंबई येथे हा विराट महामोर्चा काढण्यात येणार आहे. अनुसूचित जातींच्या आरक्षणाचे संरक्षण, सामाजिक न्यायाची जपणूक आणि उपवर्गीकरणाच्या निर्णयाविरोधात राज्यभरातील आंबेडकरी, संविधानवादी व बहुजन समाज एकत्र येत आहे. या महामोर्चासाठी मा. भीमराव यशवंतराव आंबेडकर, मा. राजकुमार बडोले (आमदार, माजी मंत्री) तसेच मा. बाबनराव घोलप (माजी मंत्री) यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. त्यामुळे राज्यभरातील कार्यकर्ते व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन या लढ्याला बळ द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. मंगळवार दि. ३० जून २०२६ रोजी दुपारी १२ वाजता मुंबई येथे होणारा हा महामोर्चा अनुसूचित जातींच्या आरक्षणाच्या संरक्षणासाठी ऐतिहासिक ठरणार असून, उपवर्गीकरण हटवा – आरक्षण वाचवा या घोषणेसह लाखो समाजबांधव सहभागी होणार असल्याचे विजय साळवे यांनी सांगितले.मराठवाड्यासह बीड जिल्ह्यातील आंबेडकरी, संविधानप्रेमी व बहुजन समाजातील युवक, महिला, विद्यार्थी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सामाजिक न्यायाच्या या लढ्यात आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन विजय साळवे, मराठवाडा समन्वयक, रिपब्लिकन सेना यांनी केले आहे.

# वैज्ञानिकांनी जागतिक पातळीवर पाऊस पाडण्याचे तंत्रज्ञान विकसित करावे – माजी आ. भीमराव धोंडे

आष्टी । प्रतिनिधी

जागतिक पातळीवर युद्धासाठी नवनविन संशोधन केले जाते त्याप्रमाणे शास्त्रज्ञांनी पाऊस पाडण्याचे तंत्रज्ञान विकसित करावे असे प्रतिपादन माजी आ. भीमराव धोंडे यांनी केले. पर्जन्यवृष्टीसाठी महाजलाभिषेक व पर्जन्ययागाचा निश्चित फायदा होईल. प्रत्येक वर्षी वाढत चाललेले तापमान कमी करण्यासाठी प्रत्येकाने वृक्षलागवड करून त्यांचे संगोपन करण्याचे आवाहन माजी आ. बाळासाहेब आजबे यांनी केले.

माजी आ. भीमराव धोंडे यांच्या संकल्पनेतून आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यासह राज्यात सर्वत्र चांगला पाऊस पडावा, शेतकऱ्यांमध्ये समृद्धी निर्माण व्हावी याकरिता कडा येथील महेश मंदिरात महाजलाभिषेक व पर्जन्ययाग यज्ञाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी महेश कारखान्याचे चेअरमन अजयदादा धोंडे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष काकासाहेब शिंदे, ह.भ.प. बबन महाराज बहिरवाल,अभयराजे धोंडे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, उपसभापती पांडुरंग नागरगोजे व इतर मान्यवर उपस्थित होते. सकाळी साडेआठ वाजता महेश मंदिरात महाजलाभिषेक व पर्जन्ययागाला सुरूवात झाली. माजी आ. भीमराव धोंडे यांनी पुढे बोलताना सांगितले की, यापूर्वी शासनाने पावसासाठी अनेक प्रयोग केले. जागतिक पातळीवर वैज्ञानिकांनी पाऊस पडावा यासाठी नविन तंत्रज्ञान विकसित केल्यास सर्वांना याचा फायदा होईल. पावसासाठी महाजलाभिषेक व पर्जन्ययाग हा जिल्ह्यातील पहिला प्रयोग झाला आहे. यज्ञ ही भारतीय जुनी परंपरा आहे. यज्ञ केल्यावर फळ मिळते,भरपूर पाऊस येईल असा



मला विश्वास आहे. यावेळी माजी आ. बाळासाहेब आजबे यांनी सांगितले की, शेतकरी एक महिना झाला पावसाची वाट पहात आहे, गतवर्षी भरपूर झाला होता.आज शेतकऱ्यांसह पुणे मुंबईला देखील पावसाची गरज आहे. पावसासाठी कडा येथील महेश मंदिरात केलेल्या महाजलाभिषेक व पर्जन्ययागाचा निश्चित फायदा होईल. भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी सांगितले की, भारतीय पुराणात सांगितल्याप्रमाणे पर्जन्य याग केल्यानंतर पाऊस पडतोच, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले प्रमाणे प्रत्येकाने एक झाड लावून त्याचे संगोपन करावे.यावेळी ह.भ.प.बबन महाराज बहिरवाल,राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष काकासाहेब शिंदे, ॲड. भाऊसाहेब लटपटे, रिपाइंचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे व इतरांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पाटोदा करताना कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती पांडुरंग नागरगोजे यांनी सांगितले की, आष्टी, पाटोदा व शिरुर तालुक्यासह महाराष्ट्रात भरपूर पाऊस पडावा म्हणून शेतकऱ्यांचे नेते माजी आ. भीमराव धोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली व माजी आमदार बाळासाहेब आजबे यांच्या उपस्थितीत महाजलाभिषेक व पर्जन्ययाग करण्यात आला. याचा निश्चित फायदा होईल. यावेळी ह.भ.प. आंधळे महाराज, ॲड. भाऊसाहेब लटपटे, चेअरमन राजेश धोंडे, किसान मोर्चाचे तालुकाध्यक्ष बबनराव औटे, नानाभाऊ वाडेकर, महेश कारखान्याचे व्हाईस चेअरमन दादासाहेब जगताप, रिपाइंचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे, पांडुरंग गावडे, नानाभाऊ वाडेकर, महेश कारखान्याचे संचालक बजरंग कर्डीले, रत्नदीप निकाळजे, बाबा वाघुले, अंकुश मुंढे, मधुकर शिरोळे, अनिल जायभाय, डी. के. कर्डीले, राम कर्डीले, ह.भ.प. पांडुरंग महाराज कर्डीले, माजी सरपंच झुंबर चव्हाण, राजाबापु नलावडे, काकासाहेब कर्डिले, दगडू पारखे, हरिभाऊ जंजिरे, प्राचार्य डॉ. हरिदास विधाते, ह.भ.प. मोरे महाराज, माजी सरपंच संतोष चव्हाण, प्राचार्य डॉ. भगवान वाघुले, विठ्ठल लांडगे, जि.प. चे माजी सदस्य सतीश झगडे, दहातोंडे, चंद्रशेखर साके, प्राचार्य डॉ. संभू वाघुले, घुले, प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, तावरे, प्रा. शिवदास विधाते, डॉ. डी. बी. राऊत, सरपंच माऊली वाघ, प्रा. डॉ . बाळासाहेब धोंडे,माऊली बोडखे, संजय शेंडे, प्रा. डॉ. शाम सांगळे, यांच्यासह परिसरातील महिला व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आष्टी तालुका किसान मोर्चाचे अध्यक्ष बबनराव औटे यांनी माजी आ. भीमराव धोंडे, माजी आ. बाळासाहेब आजबे यांचा सत्कार केला तसेच सौ. सिंधुताई औटे यांनी सौ. दमयंतीताई धोंडे व सौ. सविता आजबे यांचा सत्कार केला. याप्रसंगी महिला व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.सर्वांच्या उपस्थितीत पर्जन्य देवतेला प्रार्थना करण्यात आली. महेश कारखान्याचे संचालक रत्नदीप निकाळजे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## शाळांना निधी नाही, पण पोलीस अधीक्षक निवासस्थान दुरुस्तीसाठी ९३ लाखांचा खर्च

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कारभारावर सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. ग्रामीण भागातील शाळांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून देताना प्रशासनाकडून हात आखडता घेतला जात असताना, बीड पोलीस अधीक्षकांच्या निवासस्थानाच्या दुरुस्तीसाठी दीड वर्षात तब्बल ९३ लाख रुपयांचा खर्च करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

याप्रकरणी अंदाजपत्रके तयार करणारे, मंजुरी देणारे आणि जनतेच्या पैशाचा वापर करणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करून प्रशासकीय कारवाई करावी, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, राज्यमंत्री इंद्रनील नाईक व विभागीय आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागात ५८ शाळा इमारतविरहित असून, १७४ शाळांमधील ३१३ वर्गखोल्या मोडकळीस आलेल्या आहेत. तसेच ७० शाळांमध्ये ९८ अतिरिक्त वर्गखोल्यांची आवश्यकता असून, इमारत बांधकामासाठी सुमारे ५७ कोटी रुपये आणि २९० वर्गखोल्यांच्या दुरुस्तीसाठी १२ कोटी ५० लाख रुपयांची गरज आहे. वारंवार निवेदने, आंदोलने आणि पाठपुराव्यानंतर केवळ २८ कोटी रुपयांची मंजुरी मिळाल्याचे त्यांनी सांगितले.मात्र दुसरीकडे पोलीस अधीक्षकांच्या निवासस्थानाच्या दुरुस्तीसाठी ९३ लाख रुपयांच्या कामांना मंजुरी देण्यात आल्याने हा खर्च संतापजनक असल्याची प्रतिक्रिया डॉ. ढवळे यांनी दिली. निवासस्थानातील विविध कामांमध्ये उद्यान दुरुस्ती (८.१८ लाख), बाहेरील रंगकाम (७.७५ लाख), गेस्ट रूम व मास्टर बेडरूम फर्निचर (८.४ लाख), गार्ड रूम दुरुस्ती (७.५ लाख), स्टाफ शौचालय दुरुस्ती (८.२१ लाख), चेंबर दुरुस्ती (८.२८ लाख), पाईपलाईन दुरुस्ती (६.७६ लाख), किचन ड्रेनेज व वॉटरप्रूफिंग (८.४४ लाख), बेडरूम, गेस्ट रूम व डायनिंग हॉल सुशोभीकरण (८.४३ लाख) आणि पेव्हर ब्लॉक (८.२० लाख) अशा कामांचा समावेश असल्याचे त्यांनी सांगितले. ग्रामीण भागातील विद्यार्थी मोडकळीस आलेल्या इमारतींमध्ये जीव मुठीत धरून शिक्षण घेत आहेत. काही ठिकाणी झाडाखाली वर्ग भरतात, पिण्याचे पाणी व स्वच्छतागृहांची सुविधा नाही. अशा परिस्थितीत निवासस्थानाच्या दुरुस्तीवर झालेला एवढा खर्च पोलीस अधीक्षक नवनित कांवत साहेबांना तरी पटतोय का? असा सवाल डॉ. गणेश ढवळे यांनी केला आहे.



## गुरुनानक शाळेमध्ये छत्रपती शाहू महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी

**बीड । प्रतिनिधी**

गुरुनानक प्राथमिक विद्यालयात छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांना जयंतीनिमित्त अभिवादन श्री विठ्ठल गड शिक्षण प्रसारक मंडळ सारणी सांगवी तालुका केज जिल्हा बीड संचलित गुरुनानक प्राथमिक विद्यालय शाहूनगर बीड येथे लोक राजा छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले यावेळी आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती पवार एस ए या होत्या तर प्रमुख मार्गदर्शकाची भूमिका श्री गदळे आर ए यांनी पार पाडली. यावेळी प्रतिमा पूजन झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी आपली मनोगती व्यक्त केली यावर राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवन व कार्यावर प्रकाश टाकण्यात आला यात अमृता शहाणे, आराध्या बुराने, शंतनु शेळके, समीक्षा जाधव, संग्राम जाधव, आर्यन सपकाळ, टिके शौर्य, तिपाले आर्यन, पवार अनुजा इत्यादी विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक आदरणीय गदळे सर यांनी छत्रपती शाहू महाराजांच्या आयुष्यातील निवडक प्रसंग विद्यार्थ्यांना सांगून त्यांच्या जीवन व कार्याविषयी विद्यार्थ्यांना अवगत केले. कार्यक्रमाचे सुंदर असे सूत्रसंचालन वनवे कृष्णा यांनी केले तर आभार वनवे अवंतिका हिने मानले या कार्यक्रमाला श्रीमती डोंगरे मॅडम, श्री ठोकरे सर, तांदळे सर, गाडे मॅडम, शेळके मॅडम यांचे सहकार्य लाभले.

## पत्रकारांना शिवीगाळ व धमकी प्रकरणी खा.संजय दिना पाटील यांच्यावर गुन्हा दाखल करा-हमीदखान पठाण

पाटोदा । प्रतिनिधी

खासदार संजय दिना पाटील यांनी पत्रकारांशी कथितरित्या अशोभनीय व अपमानास्पद भाषेत संवाद साधत शिवीगाळ व धमकी दिल्याच्या प्रकाराचा मराठी पत्रकार परिषद, तालुका शाखा ता.पाटोदा यांच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकरणी खासदारांनी सार्वजनिक माफी मागितली असली तरी केवळ माफी पुरेशी नसून खासदारा विरुद्धात तात्काळ गुन्हा दाखल करून कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी मराठी पत्रकार परिषद, तालुका शाखा पाटोदाचे सचिव हमीदखान पठाण यांनी केली आहे.



यासंदर्भात प्रसिद्ध करण्यात आलेल्या पत्रकात म्हटले आहे की, पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असून जनतेचा आवाज प्रशासन व शासनापर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पत्रकार करीत असतात. अशा पत्रकारांना धमकावणे, त्यांच्याशी अपमानास्पद भाषा वापरणे अथवा त्यांच्यावर दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न करणे हे लोकशाही मूल्यांवर तसेच पत्रकारितेच्या स्वातंत्र्यावर थेट आघात करणारे आहे.

मराठी पत्रकार परिषद पाटोदा यांनी या घटनेची गंभीर दखल घेत संबंधितांवर शिवीगाळ, धमकी देणे तसेच इतर लागू असलेल्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. याबाबत तातडीने कारवाई न झाल्यास जिल्हाभर तसेच राज्यभर मराठी पत्रकार परिषदेचे मुख्यविश्वस्त एस. एम. देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली तिव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही मराठी पत्रकार परिषद पाटोद्याच्या वतीने हमीदखान पठाण यांनी दिला आहे.

## राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त तुलसी महाविद्यालयात तुलसी टेक सोल्यूशनचा शुभारंभ

### तुलसी टेक सोल्यूशन विद्यार्थ्यांना आयटी क्षेत्रात सक्षम करणारा दूरदृष्टीचा उपक्रम : प्रो.डॉ.रमेश मंझा

बीड । प्रतिनिधी

माहिती तंत्रज्ञानाच्या झपाट्याने बदलणाऱ्या युगात संगणक, नेटवर्किंग, हार्डवेअर, सॉफ्टवेअर आणि तांत्रिक देखभाल या क्षेत्रातील प्रशिक्षित व कुशल मनुष्यबळाची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. ही गरज ओळखून विद्यार्थ्यांना उद्योग कौशल्ये मिळावीत या दूरदृष्टीने प्रा. प्रदीप रोडे यांनी सुरू केलेले तुलसी टेक सोल्यूशन हे केंद्र विद्यार्थ्यांना आयटी क्षेत्रात सक्षम करण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे, असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख प्रो. डॉ. रमेश मंझा यांनी केले.



देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या इन्क्युबेशन सेंटर अंतर्गत सुरू करण्यात आलेल्या तुलसी टेक सोल्यूशन या उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते प्रमुख उद्घाटक म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तुलसी शैक्षणिक समूहाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे होते. प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी मा. भगवानराव सोनवणे, जात पडताळणी समितीचे उपआयुक्त मा. उमेश सोनवणे, प्राचार्य पंडित मुने, प्रो.डॉ. मनोहर सिरसाट, प्रा.अर्जुन राठोड, दीपाताई रोडे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रमुख अतिथी उमेश सोनवणे यांनी सांगितले की, उद्योगविश्वाच्या गरजा आणि बदलते तंत्रज्ञान लक्षात घेऊन सुरू करण्यात आलेले तुलसी टेक सोल्यूशन हे विद्यार्थ्यांसाठी कौशल्य, अनुभव आणि रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देणारे केंद्र आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थी केवळ नोकरी शोधणारे न राहता रोजगारनिर्मिती करणारे उद्योजक म्हणून घडतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. भगवानराव सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कष्ट, जिद्द, चिकाटी आणि प्रामाणिकपणा हीच यशाची गुरुकिल्ली असल्याचे सांगितले. बदलत्या काळानुसार कौशल्य विकासाला प्राधान्य देत सातत्याने स्वतःला अद्ययावत ठेवण्याचे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षीय समारोपात प्रा. प्रदीप रोडे म्हणाले की, राजर्षी शाहू महाराज आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शिक्षणविषयक विचारांचा वारसा जपत तुलसी टेक सोल्यूशन ची स्थापना करण्यात आली आहे. या केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञान, प्रत्यक्ष औद्योगिक प्रशिक्षण तसेच कमवा व शिका योजनेची संधी उपलब्ध होणार आहे. विद्यार्थ्यांनी कोणतेही क्षेत्र निवडले तरी त्यात उत्कृष्टता मिळविण्याचे ध्येय ठेवावे. प्रचंड मेहनत, सातत्य, आत्मविश्वास आणि सकारात्मक दृष्टिकोन यांच्या बळावर प्रत्येक विद्यार्थी यशाचे शिखर गाठू शकतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डी.जी. निकाळजे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. योगिता लांडगे यांनी केले, तर आभार प्रा. किशोर वाघमारे यांनी मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी तसेच शहरातील विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान ६ वरुन...

### गुलामीमुक्त समाज निर्माण

आणि लिंगवाचक शिवी देणाऱ्याला तुरुंगात टाकायचा कायदा शाहू महाराजांनी केला. शूद्र समाजाला शिक्षण, व्यवसाय आणि आत्मसन्मानाने जगण्याचे बळ शाहू महाराजांनी निर्माण करून दिले. शुद्रादी शूद्र समजल्या जाणाऱ्या महिलांचा आत्मसन्मान वाढविण्यासाठी अनेक कायदे केले. स्वीकृत नगरसेवकाची संकल्पना शाहू महाराजांनी अस्तित्वात आणून शूद्र समजल्या जाणाऱ्या भंगी समाजातील युवकाला पंडित आडनाव देऊन पहिले स्वीकृत नगरसेवक केले. वाघासारखे बळ सश्याला दिले तर तो सुद्धा डरकाळी फोडू शकतो हे ओळखून छत्रपती शाहू महाराजांनी बहुजन समाजाला शिक्षण, नोकरी, व्यवसाय आदी क्षेत्रात न्याय देण्याचे कार्य केले. मागासलेल्या महाराष्ट्रात ओबीसी, बहुजन, मागासवर्गीयांना शूद्र समजणारे आज मात्र स्वतःला शूद्र होण्यासाठी आंदोलने मोर्चे काढत असल्याची खंत उत्तम कांबळे यांनी व्यक्त केली. या व्याख्यान कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा लक्ष्मण गुंजाळ यांनी केले. तर आभार प्रदर्शन समता परिषदेचे जिल्हा कार्याध्यक्ष अविनाश उगले यांनी केले. स्नेह भोजनानंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### हिवरसिगा येथे शेतकऱ्यांना

सुधाकर निवास बीड शिरुर रोड हिवरसिगा यांच्या प्रौढ विभागातील प्रशस्त कक्षात सपन्न झाला. वाचनालयाच्या माध्यमातून शेतकरी बाधवासाठी व्यवस्था केल्याचे कृषिविभातील अधिकारी यांनी समाधान व्यक्त केले.यावेळी धर्मराज शिंदे, प्रभाकर सानप, श्रीराम भालेराव,श्रीधर सानप, नवनाथ बडे, गोवर्धन गरत, अशोक देवकर, नारायण दुधाळ, वैजिनाथ सानप,सावता दुधाळ,दिलीप दुधाळ, सिद्धेश्वर दुधाळ, महादेव देवकर, रामेश्वर पाडुळे,शाम दुधाळ, कृष्णा शिदे, प्रदिप बोराडे, विष्णू सानप,जालिंदर राऊत, अगद शिंदे, कमरूद्दीन शेख, भिमराव तिकाडे,खाजाभाई शेख, अलिम शेख, कैलाश दुधाळ, अनिल शिदे, गणेश गवळी, शिवनारयण दुधाळ, श्रीनिवास राऊत, आश्रुबा शेळके, सतिश कुटे, आसाराम शिंदे, अमोल शिंदे, बाळु सालपे, अकुश गवळी,महेश शिंदे, अतुल शिंदे,याच्यासह शेतकरी गटातील प्रमुख पदाधिकारी , व लाभार्थी शेतकरी यांची उपस्थित होते.

### वडवणीत पत्रकारांचा

अशोक निपटे, सतीश मुजमुले, ज्ञानेश्वर लंगे, शंकर जाधव यांनी व्यक्त केले.या प्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई शाखा बीडचे अध्यक्ष विनायक जाधव, वडवणीचे अध्यक्ष अशोक निपटे, डिजिटल मीडिया अध्यक्ष सतीश मुजमुले, संपादक ज्ञानेश्वर लंगे, विष्णू डोईफोडे, शेख एजाज, शंकर जाधव, रूपाली कचरे, नारायण जाधव, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे अध्यक्ष प्रा. श्रीनिवास काकडे, शंकर झाडे, अर्जुन मुंडे यांच्यासह तालुक्यातील अनेक पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### तुकाराम मुंढे यांच्या

हेच पाणी आहे असे आता सांगणे बंद झाले आहे. अनेक ठिकाणी शुद्ध पाण्यासाठी फिल्टर लावले आहेत. हा बदल केवळ आणि केवळ आयुक्त तुकाराम मुंढे यांची नियुक्ती झाल्यानंतरच होताना दिसत आहे. तुकाराम मुंडे यांच्या आदेशानंतर अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे अधिकारी आणि कर्मचारीही आता सतर्क झाले आहेत. त्यामुळे कधी कुठे धाड पडेल याचा नेम नाही अशी दहशत हॉटेल मालक, टपरी चालक आणि खाद्यपदार्थ विकणाऱ्या दुकानदारांवर आहे. त्यामुळे शक्यतो शुद्ध आणि चांगले पदार्थ आपल्याकडे मिळतील अशी व्यवस्था बऱ्याच दुकानातून करण्यात आली आहे. पूर्वीच्या काळी ठीक ठिकाणी दुधाचे स्टॉल लागायचे मात्र काही दिवसापासून हे स्टॉल बंद झाले आहेत. ग्रामीण भागातून येणारे दूध विक्रेतेही आता शुद्ध दूध विकताना दिसत आहेत. अनेक वेळा आपल्याकडे दूध नसले तरी पॅकिंगचे दूध कॅन मध्ये ओतून त्यात पाणी ओतून ते विकले जायचे मात्र हा प्रकार आहे आता बऱ्याच अंशी कमी झाला आहे. एकंदरीतच सर्वच ठिकाणी तुकाराम मुंडे यांची दहशत असून पोलिसांनी अनेक वेळा छापे मारूनही गुटखा विक्री बंद होत नव्हती. ती गुटखा विक्री आता ७०% पर्यंत बंद झालेली आहे. शहरात ठीक ठिकाणी धाडी पडत असून बाहेरून गुटखा आलाच नाही तर विकण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. त्यामुळे आता बऱ्याच टपऱ्या बंद होण्याच्या मार्गावर आहेत. विशेष म्हणजे दुधाच्या माध्यमातून विष विकण्याचे काम करणारे नराधम आता भूमिगत झाले असून शक्यतो आता शुद्ध दूध मिळण्यासाठी अडचण पडत नाही. दुधाचा तुटवडा निर्माण झाल्याने बऱ्याच अंशी शेतकऱ्यांच्या दुधाला चांगला भाव मिळत आहे. ७० ते ८० रुपये लिटरने दुधाची विक्री होताना दिसत आहे. भेसळयुक्त पदार्थ अचानक बाजारातून गायब झाल्याने नागरिकांनाही आता याबाबत समज आली आहे. जे पदार्थ सर्रास विकले जायचे ते पदार्थ अचानक गायब कसे झाले? यावर आता लोक चर्चा करू लागले आहेत. एकंदरीत राज्यांमध्ये तुकाराम मुंढे यांची दहशत असून नागरिकांच्या जीवाशी खेळ खेळणारे आणि लहान मुलांच्या मृत्यूला कारणीभूत ठरणारे हे नराधमाता भूमिगत झाले आहेत. बीड शहरातच नव्हे तर जिल्हाभरात आणि राज्यातही अन्न औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांची दहशत असून ते वारंवार व्हिडिओच्या माध्यमातून हॉटेल वाले, टपरीवाले, मेडिकल दुकानदार यांना सूचना देत आहेत. अनेक औषधांच्या दुकानावरही आता बंदी असलेले औषध मिळणे बंद झाले असून अव्वाच्या सव्वा पैसे घेऊन विक्री करण्यावर आता अंकुश आला आहे. ग्राहकही आता सजग झाले असून ठीक ठिकाणी ग्राहक चौकशी करू लागले आहेत. त्यामुळे औषध विक्रेते आता अव्वाच्या सव्वा पैसे न घेता नियमानुसारच ग्राहकाकडून पैसे घेत आहेत. आणखी काही वर्ष तुकाराम मुंढे या पदावर राहिले तर राज्यभरात भेसळ करणारे परागंदा होतील या शंका नाही. मात्र दुर्दैवाने सरकार तुकाराम मुंढे यांना एकाच पदावर जास्त काळ ठेवत नाही. प्रामाणिक अधिकारीही सरकारमधील लोकांची अडचण असते त्यामुळे त्यांची लगेच बदली होते. मात्र अन्न औषध प्रशासन आयुक्त पदी नियुक्ती झाल्यानंतर तुकाराम मुंढे यांना मोठे समर्थन मिळत असून त्यांना या पदावरून हटवू नये असी मागणी आता नागरिकच करत आहेत.

### आष्टीत २८ जून रोजी

तंत्रज्ञानाची माहितीही उपस्थितांना मिळणार आहे.

या मेळाव्यात सदस्य नोंदणी, आधुनिक दुग्ध व्यवसायाचे तंत्रज्ञान, पशुपालनातील नवीन संकल्पना, तसेच प्रगतशील गोपालकांशी थेट संवादाची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याशिवाय उत्कृष्ट दुग्ध उत्पादकांचा सत्कारही करण्यात येणार आहे. दुग्ध व्यवसाय अधिक फायदेशीर करण्यासाठी आणि आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती मिळविण्यासाठी तालुक्यातील तसेच परिसरातील सर्व दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

cmyk



# पीकविमा कंपन्यांना ६९४४ कोटींचा नफा

मुंबई / प्रतिनिधी

पंतप्रधान पीकविमा योजनेत २०२२ पासून विमा कंपन्यांनी ६ हजार ९४४ कोटी ११ लाख रुपयांचा निव्वळ नफा कमावल्याची माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी विधानसभेत लेखी उत्तरात दिली.




नरेंद्र भोंडेकर यांच्यासह अन्य सदस्यांनी पीकविमा परतावा आणि कंपन्यांनी कमावलेल्या नफ्याबाबतचा तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. २०१६ ते २०२५ या कालावधीत विमा कंपन्यांनी राज्यातील ६ कोटी २४ लाख शेतकरी, राज्य आणि केंद्र सरकारकडून सुमारे ५६ हजार ८०० कोटी रुपयांचा हप्ता जमा केला होता. त्यापैकी ४० हजार ५०० कोटी रुपयांची नुकसानभरपाई वितरित केली आहे. उर्वरित १६ हजार ३०० कोटी रुपयांचा फरक शिल्लक राहिल्याने प्रशासकीय खर्च व इतर कपाती वजा जाता सुमारे २१ ते २८ हजार रुपयांचा निव्वळ नफा कमावला असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे का? असा प्रश्न विचारला होता. तसेच या कंपन्यांनी प्रशासकीय खर्च आणि पुनर्विमा खर्चाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात नफा कमावल्याच्या तक्रारी आहेत. तसेच पुनर्रचित हवामानावर आधारित फळपीक विमा योजनेत काही सीएससी केंद्र चालकांनी केळी लागवड नसलेल्या क्षेत्राचा खोटा विमा उतरविल्याचे समोर आले आहे, हे खरे आहे का, असा प्रश्नही उपस्थित केला होता. यावर कृषिमंत्री भरणे यांनी २०१६ ते २०२६ या कालावधीत ५५ हजार ४२६ कोटी रुपयांचा विमा हप्ता दिला आहे. या कालावधीत ३९ हजार ९१८ कोटी ३ लाख रुपयांचा विमा परतावा मिळाला आहे. तसेच २०२२ पासून विमा कंपन्याचा नफा विमा हप्त्याच्या २० टक्क्यांपर्यंत मर्यादित केला आहे. त्यानुसार विमा कंपन्यांना ६९४४ कोटी ११ लाख रुपयांचा निव्वळ नफा झाला आहे. तर विमा कंपन्यांनी सरकारला ५५८३ कोटी ३ लाख रुपयांचा परतावा सरकारला जमा केला आहे, अशी माहिती लेखी उत्तरात दिली आहे.

# शेती व शेततळ्यातील उपद्रवी उंदरांचे नियंत्रण



शेतामध्ये, शेत तलावामध्ये उंदरांचा फार उपद्रव असल्याने आढळून येत आहे उंदीर यामुळे शेतातील पिकांचे व आच्छादन कुरतडल्याने शेतकऱ्यांचे फार नुकसान होत असते उंदीर हा अतिशय चपळ, चाणाक्ष व उपद्रवी प्राणी आहे.

उपद्रवी उंदरांचे नियंत्रण : सर्वप्रथम शेतातील सर्व बिळांची पाहणी करावी.बिळाच्या तोंडाला थोडेसे गवत ठेवावे किंवा बिळांची तोंडे चिखलाने किंवा मातीने बंद करून घ्यावेत दुसऱ्या दिवशी यांपैकी ज्या बिळाच्या समोरील गवत विस्कळीत दिसेल किंवा जी बिळेउघडे दिसतील त्यात उंदरांचे अस्तित्व आहे असे समजावे.उंदरांना आकर्षित करण्याकरता गव्हाची कणिक किंवा इतर कोणत्याही धान्याचा जाडाभरडा व त्यात थोडेसे गोडेतेल मिसळून विष मिसळता थोडे थोडे मिश्रण आमिष म्हणून एक दोन दिवसबिळासमोर ठेवावे. किंवा बिळामध्ये टाकावे. चटक लागण्यासाठी हे करावेतीसर्या दिवशी सायंकाळी बिळा समोर किंवा बिळामध्ये झिंक फॉस्पराइड पॉयझनबॉईटचा वापर करावाएक किलो झिंक फॉस्पराईड पॉयझन बाईट तयार करण्यासाठी एक किलो गव्हाचे कणिक किंवा इतर कोणत्याही धान्याचा जाडा भरडा घेऊन त्यात २० ते २५ ग्रॅम झिंक फॉस्फाईड चांगल्या प्रकारे मिसळून लाइट्स तयार करून घ्याव्यातबाजारात मिळणारा मैदा, गव्हाचे पीठ वापरून बनवलेल्या गोड बिस्किटांचा ही वापर यासाठी केला जाऊ शकतोझिंक फॉस्फाईड हे विषारी रसायन ही बाजारात सहज उपलब्ध होते प्रत्येक बिळासाठी साधारणपणे १-२ बाईट्स वापरून पालापाचोळा किंवा गवत टाकून ते झाकून घ्यावेत दुसऱ्या दिवशी शेतात जे मेलेले उंदीर सापडतील ते गोळा करून खड्ड्यात पुरून टाकावेत. बाईटसचा पुन्हा लगेच वापर न करता पंधरा ते वीस दिवसांच्या कालावधीनंतर परत वापर करावा अशा प्रकारे संपूर्ण उंदरांचे पूर्ण नियंत्रण होईपर्यंत हे उपाय योजना करावीझिंक फॉस्फाईड हे उंदरांप्रमाणेच इतर प्राण्यांसाठी घातक असल्याने त्याचा वापर काळजीपूर्वक करावा तसेच हे विषारी बाईड्स बनवताना हातात हात मोजे घालावेत, आवश्यक इतर सर्व काळजी घ्यावी शेततळ्या भोवती गिरीपुष्प या वनस्पतींची लागवड केल्यासही उंदीर दूर राहतात.

# मधुमक्षिका पालन शेतकऱ्यांसाठी एक वरदानच



निसर्गातील कीटकांचा विचार केला तर आपल्याला फक्त पिकांना हानिकारक असणारेच किटक आठवतात. पण आपल्यासाठी मधासारखे अमृत निर्माण करणारा, परागीभवनाद्वारे पिकांच्या उत्पन्नात २५ ते ३५ % वाढ करणारा, तसेच मेण, परागकण, राजान्न, प्रोपोलिस, मधमाशी ब्रेड, ब्रुड व मधमाशांचे विष (व्हेनम) देणारा सामाजिक, वसाहतीत निष्ठेने, निस्वार्थपने व अत्यंत शिस्तित काम करणारा किटक म्हणजे मधुमक्षिका होय. मानवास उपयुक्त अशा परोपकारी किटकाची थोरवी सांगताना जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ अल्बर्ट आईनस्टाईन यांनी सांगितले होते की, मधमाशा जर पृथ्वीतलावरुन नष्ट झाल्या तर मनुष्य जातीसह अख्खी जिवसृष्टी पुढील चार वर्षांतच संपुष्टात येईल म्हणून अशा या सजिवसृष्टीकरीता अत्यंत उपयुक्त अशा किटकाचे संवर्धन व संगोपन करणे आज काळाची गरज आहे.

महाराष्ट्र राज्यात असलेली विभिन्न प्रकारची भौगोलिक परिस्थिती, नैसर्गिक साधनसंपत्तीची अमाप देणगी झाडझुडपे व शेतीपिके यातुन सतत मिळत असलेला फुलारा या सर्व समृद्ध साधनसंपत्तीचा आधुनिक शास्त्रीय पद्धतीने योग्य असा उपयोग करुन शेतकऱ्यांसाठी मधमाशीपालन हा किफायतशिर शेतीपुरक जोडधंदा असून शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्न देणारा उद्योग आहे. भारतात मधमाशीपालन व्यवसायासाठी उत्तेजनपर अखिल भारतील मधपालांची संघटना म्हणजे ऑल इंडिया बी किपर्स असोसिएशन स्थापना करण्यात आली. महाराष्ट्रात केंद्रिय मधमाशी अनुसंधान संस्था, पुणे तसेच खादी व ग्रामोद्योग महाबळेश्वरलाही मधुमक्षिकापालनाबर चांगले संशोधन सुरु आहे. अशाप्रकारे मधुमक्षिकापालन हा कुठलींही जागा, इमारत, विहीर, पाणी व विज यासारखी गुंतवणुक न लागणारा तसेच रोजगार निर्मितीचा उत्तम क्षमता असणारा महिला व पुरुषवर्गाला करता येणारा जोडधंदा आहे.

मधमाशांचे बहुगुणी महत्त्व : १) परागीभवन – मधमाशांच्या परागीभवनामुळे निसर्गाचा जैविक समतोल साधण्यास मदत होते. व्यवसायिक पद्धतीने मधुमाक्षिकांच्या वसाहती पिकांमध्ये फुले येणाऱ्या काळात ठेवल्यास उत्पन्नात २५ ते ३५ % वाढ होते. तसेच मधमाशांच्या परागीभवनाद्वारे मिळणारे उत्पन्न तुलनेने अधिक पौष्टिक मानले जाते. मधमाश्यांमुळे परागीभवन होत असलेले पिक म्हणजे लिंबू, संत्री, मोसंबी, पेरु, मोहरी, तीळ, सुर्यफुल, सोयाबीन, कारले, वांगी, भेंडी, मिरची, काकडी, कलिंगड, भोपळा, पडपळ, कारली, कोबी, मुळा, बिट, कांदा, लसुण, राजगिरा, पालक, तूर, मुग, उडीद, मटकी, चवळी, चिंच, चंदन, शेवगा, कवठ, कापूस, तंबाखू, गाजर व कोथिंबीर होय. २) मध:– मध हे निसर्गात सर्वात पौष्टिक अन्न मानले जाते. कारण मधामध्ये मानवी शरीराला आवश्यक असे सर्व पोषक घटक असतात. मध हा शितल मधुर, नेत्रास हितकारक, स्वर सुधारणारा, बुद्धीची धारणाशक्ती वाढवणारा खोकला, पित्त, कफ, क्षय दुर करणारा, रक्तशुद्ध करणे, पोटदुखी, मळमळ तसेच त्वचा केसांचे आरोग्य राखणारा पदार्थ आहे. मध म्हणजे कर्करोग हृदयरोग, मधुमेह, प्रतिबंध तसेच चिंताग्रस्त पणासाठी आरामदायक शक्तीवर्धक पदार्थ आहे. ३) मेण – मेण हे मधमाशांपासुन मिळणारे एक नैसर्गिक उत्पादन आहे. मेणाच्या विविध वापरांपैकी महत्वाचा उपयोग कॉस्मेटिक्स, फळे व भाज्यांचे पोस्ट हार्वेस्ट ग्लोझिंग एजेंट, सर्जिकल हाडे, मेणबत्या, टुथपेस्ट, कले, क्रेझॉन व इतरही आहेत. ४) राजान्न (रॉयल जेली) – राजान्न म्हणजे मधमाशांचे दुध होय. राजान्न प्राषण केल्याने बलवान राणीमाशी तयार होते. राजान्न पोटांच्या विविध आजारांवर यकृत समस्या, अन्नपचन समस्या, भुक न लागणे, थकवा, निद्रानाश वृद्धापकाळातील आजार, गरोदरपणा, खेळांडूंसाठी शक्तीवर्धक व आरोग्यवर्धक म्हणून काम करते, शितगृहाशिवाय राजान्न ५ दिवसांपर्यंत सेवन करु शकतो. वाळलेले राजान्न कॅपसुलच्या रुपाने सेवन करुन त्वचेचे व केसांचे सौंदर्य टिकवते. ५) प्रोपोलिस: प्रोपोलिस नावाच्या चिकट द्रव पदार्थाच्या सहाय्याने पोळे झाडाला चिकटवले जाते. प्रोपोलिसमुळे पोळ्याला मुंग्यांचा प्रादुर्भाव होत नाही. याचा उपयोग सौंदर्य प्रसाधने सुगंधी तेल व तुटलेली हाडे, स्नायुचा आजार व त्वचेचे आजार बरे करण्यासाठी होतो. ६) मधमाशी ब्रेड: मधमाशी ब्रेड किंवा भाकरी हे लहान अळ्या व मधमाशांसाठी लागणारा अन्नाचा मुख्य स्त्रोत आहे. ॲनिमिया, मधुमेह, डायरिया, मुळव्याध, बी.पी., नैराश्य व मोठ्या शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णांसाठी उपयुक्त घटक आहे. ७) मधमाशी विष: मधमाशीचे विष शरीरातील उतींना रक्त पुरवठा करण्यास उपयुक्त ठरते व शरीरातील लॅक्टिक आम्ल विरघळून स्नायू वेदना बऱ्या करण्यास मदत करते. या विषाचा मुख्य उपयोग संधीवात बरा करण्यासाठी होतो ८) मधमाशीचे बुड: मध काढल्यानंतर अंडी, अळ्या, कोष म्हणजे ब्रुड होय. हे ब्रुड वृद्ध पाकळीतील आजारांवर व खेळांडुंना अतिरीक्त उर्जा पुरवण्यासाठी वापरतात.

मधुमक्षिकेत्त्या विविध जाती : १) सातेरी माशी – या माशांच्या वसाहती झाडांच्या डोलीमध्ये, कडा कपारीच्या छोट्या गुहांमध्ये, भिंतीतील गाभारे, मुंग्यांचे वारुळ, अंधाऱ्या ठिकाणी एकाला एक असे ठरावीक अंतरावर समांतर पोळी बांधतात. सोतेरी वसाहतीपासुन प्रतिवर्षी ५ ते ७ किलो मध उत्पन्न होवू शकते. एका वसाहतीत २५ ते ३० हजार माशा असतात. २) युरोपियन माशा – या मधमाशा झाडाच्या ढोलीत, दगडाच्या कपारीत व अंधाऱ्या ठिकाणी आढळून येत असल्याने त्यांचे कृत्रीमरीत्या पालन केले जाते. भारतात पंजाब, हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार व महाराष्ट्रातील मराठवाड्यात यांचे पालन केले जाते या माशांचे सतत एका जागेवरुन दुसऱ्या जागेवर स्थलांतर करणे गरजेचे असते या माशांना सातेरी माशांपेक्षा जास्त प्रमाणात अन्नसाठा लागतो. या माशांपासुन वर्षाला सरासरी २५ ते ३० किलो मध मिळु शकते. ३) आग्या माशी – महाराष्ट्रातील विदर्भात या माशांचे मोठ्याप्रमाणात पालन केले जाते. या माशा आकाराने सर्वात मोठ्या असून त्यांना रानटी माशा म्हणतात. या माशा स्वभावाने रागीट, तापट असून हल्ला केल्यास दंश खुप वेदनादायक असतो. या माशा वर्षाकाठी ८ ते ५० किलो पर्यंत मध तयार करु शकतात व मेणही भरपुर प्रमाणात तयार करतात.. ४) फुलोरी किंवा काटेरी माशी: या माशा भारतात सर्वत्र आढळून येतात. झाडाच्या फांदीला, झुडपात, काटेरी कुंपनात एकच पोळे बांधतात. उजेडात पोळे बांधत असल्याने स्थलांतर करणे व मध गोळा करण्याची प्रवृत्ती कमी असते. या माशांपासुन १ ते २ किलो मध मिळु शकते. या माशा आकाराने लहान असल्याने परागीभवनात मोठा वाटा आहे. ५) पोयाची माशी – या माशा आकराने सर्वात लहान असून झाडाच्या ढोलीत, अंधारात, जुण्या मातीच्या भिंतीत पोळे बांधतात. या माशांना नांगी नसल्याने त्या डंक मारत नाही. या माशा कमी प्रमाणात मधगोळा करत असल्या तरी परागीभवनासाठी चांगली मदत होते.

मधमाशांची वसाहत कार्य व जीवनक्रम : १) राणीमाशी – एका वसाहतीत एकच राणीमाशी असून ती अन्नाच्या उपलब्धते नुसार दिवसाला २०० ते १००० अंडी घालते. तीचे आयुष्य २ ते ४ वर्ष असते. राणीगंधामुळे इतर माशा वसाहतीत राणीची उपस्थिती ओळखतात व ती नसेल तर वसाहत उडुन जाते.२) कामकरी माशी – अंडी घातल्यानंतर २१ दिवसात कामकरी माशांचा जन्म होतो व त्या ६ ते ७ आठवडे जगतात. कामकरी माशा परागकण व मकरंद वाहून आणणे व पोळ्याचे रक्षण करणे असे सर्व कामे करतात.३) नरमाशी – राणीने अफल अंडी घातल्यानंतर २४ तासांनी नराचा जन्म होतो. नराला नांगी नसल्याने तो कधिही डंख मारीत नाही. नराचे काम राणी सोबत संयोग करण्यापलीकडे कुठलेच नसते म्हणून संयोग झाला की कामकरी माशी नराला मारुन टाकतात.

मधुमक्षिकापालनासाठी आवश्यक साधनसामुग्री – १ ) मधुपेटी – सातेरी माशांकरीता ए टाईप व बी टाईप तर युरोपीयनसाठी लँगस्टोथ टाईप पेटीचा उपयोग होतो. २) मधकाढणी यंत्र – सदर यंत्राद्वारे मेणाच्या चौकटी न मोडता मध काढले जाते. ३) धुराडे–: धुराड्याच्या वापरामुळे मधमाशा शांत होवून पेटीची देखभाल चांगली करता येते. ४) संरक्षक कपडे – मधमाशांच्या दंशापासुन वाचवण्यासाठी सरद कपडे वापरणे आवश्यक आहेत. ५) इतर साधने – चाकु, हातमोजे, मेणपत्रे, पटाशी, पोलन ट्रॅप राणी पिंजरा व स्वार्म नेट हे साधने येतोत.

मधपोळ्यातील किडी रोग व इतर शत्रु – १) मेणकिडा – मेणकिडा मधमाशीचा प्रमुख शत्रु असुन पेटीत ५०० ते १००० अंडी घातल्यामुळे माशा पोळे सोडून जाण्याची शक्यता असते याच्या नियंत्रणासाठी पेटी नेहमी स्वच्छ ठेवणे गरजेचे आहे. २) कोळी, मुंग्या, झुरळे, पाली, गोचिड यांच्या नियंत्रणासाठी पेटीच्या व स्टँडखाली पाण्याच्या वाट्या भरुन ठेवून वसाहत नेहमी स्वच्छ ठेवणे व वसाहतीचे सतत सर्वेक्षण करणे गरजेचे आहे. ३) ग्रीन बी इटर – हे पक्षी पेटीजवळच्या झाडावर बसून येजा करणाऱ्या माशांना खातात.

४) अमेरीकन फावुल बुड हा रोग बॅक्टेरीयामुळे होत असून संसर्ग झाल्यास अळ्या कोषावस्थेपुर्विच मरतात. रोगग्रस्त अळ्यांच्या शरीरातून चिकट द्रव येवून वसाहतीचा घाण वास येतो. ५) युरोपियन फावुल बुड – हा रोग जीवाणूंमुळे होत असून संसर्ग झाल्यास अख्खी वसाहत विस्कळीत होते. ६) सॅक बुड व्हायरस – हा रोग विषाणूंमुळे होत असून रोगग्रस्त अळी कोषात जाण्यापुर्वीच मरते. ७) ॲकराईन रोग – हा रोग गोचिडापासून होत असून मादी गोचिड तिची अंडी मधमाशांच्या श्वसननलिकेत घातल्याने श्वसनमार्गाची कोंडी होवून माशी तडफडून मरते. ८) नोसेमा रोग –या रोगाची वाढ मधमाशांच्या अन्ननलिकेत होत असून रोगाने ग्रस्त झालेल्या माशा २–३ दिवसात मरतात त्यामुळे वसाहत कमजोर होवून नष्ट होते. याच्या नियंत्रणासाठी वसाहतीची योग्यरीत्या स्वच्छता ठेवणे गरजेचे आहे.




## महत्वाच्या घटना

१६९३ : लंडनमध्ये पहिले महिला मासिक द लेडीज मर्क्युरी प्रकाशित केले गेले.
१९५० : अमेरिकेने कोरियन युद्धात आपले सैन्य पाठवण्याचा निर्णय घेतला.
१९५४ : अणुशक्तीवर चालणारे जगातील पहिले विद्युतकेंद्र (क्षमता: ५००० किलो वॅट) रशियातील मॉस्कोजवळ ओबनिन्स्क येथे सुरू झाले.
१९६४ : साली दिल्ली येथील तीन मूर्तिच्या भवनामध्ये भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांचे संग्रहालय बनवण्याचा निर्णय घेण्यात आला.
१९६७ : लंडनजवळ एन्फिल्ड येथे जगातील पहिले ए.टी.एम. सुरू.
१९७७ : जिबुटी ला (फ्रान्सपासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९९१ : युगोस्लाव्हियाने स्लोव्हेनियावर आक्रमण केले.
१९९६ : अर्थतज्ज्ञ द. रा. पेंडसे यांना 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज'चा 'चिंतामणराव देशमुख पुरस्कार' जाहीर
१९८१ : कंबोडियाने संविधान स्वीकारले.
२००२ : परमाणु शस्त्र नष्ट करण्याच्या रशियाच्या योजनेस जी–८ देशांनी आपली सहमती दर्शविली.
२००८ : साली मायक्रोसॉफ्ट कॉर्पोरेशनचे अध्यक्ष बिल गेट्स यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.
२०१५ : साली संयुक्त राष्ट्र संघाने भारतीय चित्रपटाच्या इतिहासात विशेष स्थान असणार्या सत्यजित रे यांचे चित्र प्रदर्शित करण्याचा निर्णय घेतला.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४६२ : लुई (बारावा) फ्रान्सचा राजा (मृत्यू: १ जानेवारी १५१५)
१५५० : चार्ल्स (नववा) फ्रान्सचा राजा (मृत्यू: ३० मे १५७४)
१८३८ : बंकिमचंद्र चट्टोपाध्याय बंगाली कादंबरीकार, कवी, लेखक आणि पत्रकार. त्यांनी लिहिलेल्या 'आनंदमठ' या कादंबरीत 'वंदे मातरम' हे गीत असून या गीताने स्वातंत्र्यलढ्यातील सहभागींना प्रेरणा मिळाली. (मृत्यू: ८ एप्रिल १८९४)
१८६४ : शिवराम महादेव परांजपे 'काळ' कर्ते, विद्वान, वक्ते, लेखक, स्वातंत्र्यसैनिक व पत्रकार (मृत्यू: २७ सप्टेंबर १९२९)
१८६९ : नोबेल पारितोषिक विजेते जर्मन प्राणीशास्त्रज्ञ हॅन्स स्पेमन यांचा जन्म.
१८७५ : दत्तात्रेय कोंडो घाटे ऊर्फ 'कवी दत्त' (मृत्यू: १३ मार्च १८९९)
१८८० : हेलन केलर अंध व मूकबधीर असुनही कला शाखेची पदवी मिळवलेल्या पहिल्या व्यक्ती, समाजसेविका, राजकीय कार्यकर्त्या व शिक्षिका (मृत्यू: १ जून १९६८)
१८९९ : पॅन अमेरिकन वर्ल्ड एअरवेज चे स्थापक जुआन पेप्पे यांचा जन्म. (मृत्यू: ३ एप्रिल १९८१)
१९१७ : खंडेराव मोरेश्वर ऊर्फ 'खंडू' रांगणेकर आक्रमक डावखुरे फलंदाज (मृत्यू: ११ आक्टोबर १९८४)
१९२२ : ज्ञानपीठ पुरस्कार सन्मानित प्रख्यात भारतीय तामिळ भाषिक लेखक, कादंबरीकार, लघुकथा लेखक, पत्रकार, व्यंगचित्रकार, प्रवासी लेखक, नाटककार आणि पटकथा लेखक अकिलन यांचा जन्मदिन.
१९३९ : राहूलदेव बर्मन तथा 'पंचमदा' संगीतकार (मृत्यू: ४ जानेवारी १९९४)
१९६२ : भारतीय–कॅनडातील उद्योगपती सुनंदा पुष्कर यांचा जन्म. (मृत्यू: १७ जानेवारी २०१४)
१९६४: साली पद्मश्री आणि अर्जुन पुरस्कार प्राप्त उत्कृष्ट सेवानिवृत्त भारतीय धावपटू पी. टी. उषा यांचा जन्मदिन.

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७०८ : धनाजी जाधव मराठा साम्राज्यातील सेनापती (जन्म: १६५०)
१८३९ : महाराजा रणजितसिंग शिख साम्राज्याचे संस्थापक (जन्म: १३ नोव्हेंबर १७८०)
१९५७ : हर्मन बुहल फ्रिट्झ विंटरस्टेलर, मार्कस श्मक, कर्ट डिमबर्गर यांच्या सोबत ब्रॉड शिखर पहिल्यांदा चढणारे ऑस्टीयन गिर्यारोहक (जन्म: २१ सप्टेंबर १९२४)
१९९६ : अल्बर्ट आर. ब्रोकोली 'जेम्स बाँड' पटांचे निर्माते (जन्म: ५ एप्रिल १९०९)
१९९८ : होमी जे. एच. तल्यारखान गांधीवादी नेते, सिक्कीमचे पहिले राज्यपाल, मंत्री व आमदार (जन्म: ९ फेब्रुवारी १९१७)
२००० : द. न. गोखले शिक्षणतज्ज्ञ व चरित्रकार (जन्म: )
२००२ : भारतीय उपराष्ट्रपती कृष्णकांत यांचे निधन.
२००८ : फील्ड मार्शल सॅम माणेकशा (जन्म: ३ एप्रिल १९१४)

# शुभकार्यात महत्त्वाची आणि तापट स्वभावाची, 'तोडा म्हैस'

तामिळनाडू राज्यात आढळणारी 'तोडा म्हैस' तेथील आदिवासी समाजासाठी महत्त्वाची आहे. तोडा या आदिवासी जमातीच्या सांस्कृतिक जीवनामध्ये विशेषतः जन्म, मृत्यू, लग्नकार्य इ. प्रसंगांच्या वेळी या जातीच्या म्हशींना विशेष स्थान आहे. जाणून घेऊ या तोडा म्हशीची वैशिष्ट्ये. उगम स्थान : तोडा म्हैस ही तामिळनाडू राज्यातील नीलगिरी टेकड्यांच्या टापूमध्ये आढळते. तोडा या आदिवासी जमाती कडून दूध उत्पादनांसाठी ही पाळली जाते. या आदिवासी जमातीच्या नावावरून या म्हशीला तोडा हे नाव पडले असावे. शरीर रचना : इतर म्हशींपेक्षा दिसायला ह्या अगदी वेगळ्या आहेत. शरीर (धड) लांब असून त्यांची छाती विस्तृत व भरदार असते. पाय आखूड पण मजबूत असतात व त्या चांगल्याच ताकदवान असतात. शिंगे लांब आणि अर्धगोलाकार आकारात बदलणारी असतात. शिंगे पायथ्याशी जाड असून प्रथम बाहेरच्या दिशेने वळून, थोडेसे खालच्या दिशेने जातात आणि वरच्या दिशेने बाहेर पडतात. शेवटी शिंगाचे टोक आतील बाजूस वळलेले असतात ज्यामुळे शिंगांचा वैशिष्ट्य पूर्णपणे चंद्रकोर आकार किंवा अर्धवर्तुळ बनतो. प्रौढ म्हशींमध्ये, कातडीचा मुख्य रंग भुरकट आणि राखाडी असतो. म्हशीचे वजन सुमारे ३८० किलोपर्यंत असते.

प्रजोत्पादन आणि दूध उत्पादन : जवळपास ४७ महिन्यात ही म्हैस प्रथम माजावर येते. सरासरी दूध देण्याचा कालावधी हा २०० ते २५० दिवसांचा असून एका वेतात ५०० लिटर पर्यंत दूध देतात. दिवसाला ४.५ ते ७ लिटर दूध देतात. विशेष माहिती : म्हशीची ही जात जास्त पाऊस आणि जास्त आर्द्रता असलेल्या भागात चांगली वाढते. या म्हशीचा स्वभाव तापट व खुनशी असतो.

cmyk

# संत मुक्ताबाईंची पालखी ४ जूलै रोजी जालना हद्दीत

### ना. पंकजाताई मुंडे यांनी घेतली जिल्हा प्रशासनाची बैठक | पालखी सोहळा व प्रथमच होणाऱ्या रिंगण सोहळ्याची तयारी समन्वयाने पूर्ण करण्याचे दिले निर्देश | वारकऱ्यांची गैरसोय होता कामा नये ; स्वच्छता व पिण्याच्या पाण्याबाबत विशेष काळजी घ्या

जालना

आषाढी एकादशीच्या अनुषंगाने पुढील महिन्यात ४ जूलै रोजी जालना जिल्ह्यातून मार्गक्रमण करणाऱ्या श्री संत मुक्ताबाई पालखी सोहळ्याच्या तसेच जिल्ह्यात प्रथमच आयोजित करण्यात येत असलेल्या रिंगण सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा जिल्हयाच्या पालकमंत्री ना. पंकजा मुंडे यांनी आज दूरदृश्य प्रणालीद्वारे जिल्हा प्रशासनाची आढावा बैठक घेतली. पालखी व रिंगण सोहळा निर्विघ्न, सुरक्षित, शिस्तबद्ध व भक्तिमय वातावरणात पार पाडण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वय राखून नियोजनबद्ध पद्धतीने कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी बैठकीत दिले.



या बैठकीस दूरदृश्य प्रणालीद्वारे खासदार डॉ. कल्याण काळे, आमदार सर्वश्री सुहास शिरसाठ, बबनराव लोणीकर, नारायण कुचे, हिकमत उढाण हे तर आमदार अर्जुन खोतकर, महापौर वंदना मगरे, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, पोलीस अधीक्षक तेगबीर सिंग संधू, जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी कृष्णकांत कनवारिया, मनपा आयुक्त अंजली शर्मा, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) संदीप पवार, संत मुक्ताई संस्थान, मुक्ताईनगर अध्यक्ष ॲड. रविंद्र पाटील तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालयातून प्रत्यक्ष बैठकीस उपस्थित होते.

बैठकीत ना.पंकजाताई मुंडे यांनी वारकऱ्यांच्या सेवेत कोणतीही कमतरता राहू नये, यासाठी सर्व विभागांनी योग्य नियोजन करुन आपापल्या जबाबदाऱ्या वेळेत पूर्ण कराव्यात, असे निर्देश दिले. पालखी मार्गावरील रस्त्यांची दुरुस्ती, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छता, अखंडित वीज पुरवठा, आरोग्य सुविधा औषधीसाठा, तात्पुरती वैद्यकीय पथके, मोबाईल व सार्वजनिक स्वच्छतागृहे तसेच मुक्कामस्थळी आवश्यक सर्व मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. पोलीस विभागास कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, वाहतूक नियंत्रण, गर्दी व्यवस्थापन, संवेदनशील ठिकाणी पुरेसा बंदोबस्त ठेवणे तसेच आवश्यकतेनुसार वाहतूक वळविण्याचे नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले. त्याचबरोबर अग्निशमन, महसूल, सार्वजनिक बांधकाम, ग्रामपंचायत, नगरपरिषद, महानगरपालिका, महावितरण, सार्वजनिक आरोग्य, पशुसंवर्धन, अन्न व औषध प्रशासन, परिवहन तसेच इतर सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने नियोजन करून वारकऱ्यांना कोणतीही अडचण निर्माण होणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. पालखी मार्गावरील स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता, अन्नपदार्थांची तपासणी, सार्वजनिक आरोग्य विषयक प्रतिबंधात्मक उपाययोजना तसेच संसर्गजन्य आजारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आवश्यक खबरदारी घेण्यावर पालकमंत्र्यांनी विशेष भर दिला. बैठकीत प्रत्येक विभागाने केलेल्या तयारीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. आवश्यक त्या ठिकाणी तात्काळ सुधारणा करून सर्व तयारी विहित कालावधीत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. सर्व यंत्रणांनी क्षेत्रीय स्तरावर नियमित पाहणी करून स्थानिक प्रशासनाशी सातत्याने समन्वय राखावा तसेच कोणतीही अडचण निर्माण झाल्यास तात्काळ उपाययोजना कराव्यात, असे निर्देश ही पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी दिले. पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी दिलेल्या सूचनांनुसार जिल्हा प्रशासनामार्फत योग्य नियोजन करून सर्व कार्यवाही करण्यात येईल असे जिल्हाधिकारी मित्तल यांनी सांगितले.

---

## मार्डी येथे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांचा मुक्कामी दौरा

### अवैध दारू विक्रीवर कडक कारवाईचे निर्देश

जालना। प्रतिनिधी

ग्रामीण भागातील नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष जाणून घेऊन प्रशासन जनतेच्या दारापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने जालना जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी अंबड तालुक्यातील मौजे मार्डी येथे २२ जून रोजी मुक्कामी दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी ग्रामस्थांशी थेट संवाद साधत विविध शासकीय योजनांचा आढावा घेतला, गावातील विकासकामांची पाहणी केली तसेच अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या महिला ग्रामसंघाच्या हॉलचा प्रश्न जागेवरच निकाली काढून लोकाभिमुख प्रशासनाचा आदर्श निर्माण केला. दौऱ्याची सुरुवात गावातील मंदिरात आयोजित करण्यात आलेल्या भव्य जनसंवाद सभेने झाली. या सभेला ५०० हून अधिक ग्रामस्थ, विशेषतः महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. ग्रामस्थांनी गावातील विविध समस्या थेट जिल्हाधिकाऱ्यांसमोर मांडल्या.

गावातील महिला व्हिलेज ऑर्गनायझेशन (ग्रामसंघ) अनेक वर्षांपासून कार्यरत असूनही त्यांना स्वतःचे कार्यालय उपलब्ध नव्हते. ग्रामपंचायतीने बांधलेल्या गाळ्यांवरील हॉल काही व्यक्तींच्या अनधिकृत ताब्यात असल्याची तक्रार महिलांनी केली. या तक्रारीची गंभीर दखल घेत जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दुसऱ्याच दिवशी सकाळी प्रत्यक्ष स्थळी भेट देऊन संबंधित हॉलचा ताबा महिलांना मिळवून दिला. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न निकाली निघाल्याने महिलांनी समाधान व्यक्त करत जिल्हाधिकाऱ्यांचे आभार मानले. जनसंवाद सभेत महिलांनी गावातील विविध ठिकाणी सुरू असलेल्या अवैध दारूविक्रीमुळे कौटुंबिक आणि सामाजिक वातावरण बिघडत असल्याची व्यथा मांडली. यावर जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित यंत्रणेला तात्काळ कारवाईचे आदेश देत गावातील सर्व अवैध दारू अड्ड्यांवर कठोर



कायदेशीर कारवाई केली जाईल, असे स्पष्ट केले.

यंदा 'एल निनो'च्या प्रभावामुळे कमी पावसाची शक्यता लक्षात घेऊन शेतकऱ्यांनी पारंपरिक पिकांवर अवलंबून न राहता आधुनिक आणि कमी पाण्यात येणाऱ्या अधिक उत्पन्न देणाऱ्या पिकांकडे वळावे, असे आवाहन जिल्हाधिकारी मित्तल यांनी केले. चिया सीड्सची लागवड, रेशीम शेती (सेरीकल्चर) यांसारख्या हाय-व्हॅल्यू शेतीबरोबरच 'जल कवच' योजनेअंतर्गत विहीर पुनर्भरण, शेततळ्यांचा वापर आणि जलसंधारणाच्या उपाययोजनांबाबत त्यांनी शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. २३ जून रोजी पहाटेच जिल्हाधिकाऱ्यांनी गावातील विविध शासकीय कार्यालयांची आणि संस्थांची प्रत्यक्ष पाहणी केली. महा-ई-सेवा केंद्रात नागरिकांना वेळेत आणि योग्य दरात सेवा मिळत असल्याची खातरजमा करण्यात आली. रेशन दुकानात अन्नसुरक्षा योजनेचा लाभ पात्र लाभार्थ्यांना मिळत असल्याची तपासणी करण्यात आली. ग्रामपंचायत कार्यालयातील कामकाजावर समाधान व्यक्त करत गावाने 'उत्कृष्ट ग्रामपंचायत पुरस्कार' मिळविण्यासाठी डिजिटल प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला भेट देताना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी विद्यार्थ्यांना गणित आणि इंग्रजी विषयांचे धडे दिले. तसेच शिक्षकांशी संवाद साधून गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी आवश्यक सूचना केल्या.

अंगणवाडी केंद्राच्या तपासणीत साठा आणि रजिस्टरमध्ये तफावत आढळून आल्याने जिल्हाधिकाऱ्यांनी एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांना तातडीने चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. यावेळी बालकांसाठी तयार करण्यात आलेल्या खिचडीची गुणवत्ता तपासण्यासाठी त्यांनी स्वतः अन्नाची चवही घेतली. वरिष्ठ अधिकारी स्वतः गावात मुक्काम करून नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष ऐकून त्यावर तत्काळ निर्णय घेत असल्याने ग्रामस्थांनी प्रशासनाच्या या लोकाभिमुख उपक्रमाचे स्वागत केले. नरेगा, वीजपुरवठा, पाणीपुरवठा तसेच विविध विकासकामांबाबतही या दौऱ्यात सकारात्मक चर्चा झाली. या दौऱ्यात अंबडचे उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी, नगर परिषद अध्यक्ष, स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

---

## पंधरा दिवसापासून जांभूळवाडी शाळेला कुलूप विद्यार्थ्यांची शाळा मंदिर वृक्षखाली व रस्त्यावर !

### शिक्षक टेकाळे,खेडकर,विस्तार अधिकारी क्षीरसागर,गटशिक्षणाधिकारी कराड यांचे निलंबन करणार का?

पाथर्डी। प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील एकनाथवाडी येथील जांभुळवाडी ही वस्ती शाळा शाळा उघडल्याचा दिनांक १५ जून २०२६ पासून पंधरा दिवसापासून कुलूप लावल्याने बंद अवस्थेत असून विद्यार्थ्यांची शाळा रस्त्यावर भरत असल्याने शैक्षणिक क्षेत्रातील पवित्र असलेल्या ज्ञान मंदिराला थेट कुलूप लावल्याने संतापाची लाट उसळली आहे विद्यार्थ्यांना मोफत प्राथमिक शिक्षण कायदा २००९ कायद्याचे उल्लंघन करत पंधरा दिवसापासून शाळेच्या विद्यार्थ्यांचे दैनंदिन अध्यापन व शालेय नुकसान केले आहे विद्यार्थ्यांना गणवेश पुस्तक वाटप करण्यात आले नसून पंधरा दिवसापासून ज्ञानमंदिराला कुलूप लावल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान करून कर्तव्यात कसूर करणारे बेजबाबदार शिक्षक आजिनाथ खेडकर सहशिक्षक लक्ष्मण टेकाळे विस्तारअधिकारी निलेश क्षीरसागर व गटशिक्षणाधिकारी शिवाजी कराड यांना तातडीने निलंबित करण्याची मागणी करण्यात येत आहे याबाबत शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्याकडे लेखी तक्रार करण्यात आली आहे.

### दोन गुंठे जागेचे दान आणि ग्रामपंचायतचे राजकारण!

एकनाथवाडी गावातील जांभुळवाडी वस्तीवर शेतकरी सुदाम नामदेव खेडकर या ग्रहस्थाने सन २००० वर्षी जांभळवाडी वस्तीवर वस्ती शाळा व्हावी यासाठी स्वतःच्या मालकीची दोन गुंठे जागा शाळेसाठी देऊ केली त्या बदल्यात आपला अपंग मुलगा किंबहुना सून यांना वस्ती शाळेवर अंगणवाडी मदतनीस म्हणून घ्यावे असे तत्कालीन ग्रामपंचायतच्या पुढाऱ्यांनी आश्वासन दिल्याने वस्ती शाळा सुरू झाली परंतु सुदाम खेडकर यांच्या कुटुंबातील मुलगा किंवा सून यांना कुठल्याही प्रकारचे अंगणवाडी मदतनीस नोकरी पुनर्वसन न केल्याने गेल्या २६ वर्षापासून वाद प्रलंबित आहे.

पाथर्डी तालुक्यातील एकनाथवाडी येथील जांभूळवाडी वस्ती शाळेवरची घटना अत्यंत दुर्दैवी असून पंधरा दिवसापासून शाळेतील चिमुकल्यांना रस्त्यावर बसावे लागत आहे सन २००० वर्षी सुदाम खेडकर गृहस्थाने आपल्या मालकीची दोन गुंठे जागा शाळेसाठी ग्रामपंचायतला बक्षीसपत्र दिल्याने त्यांचा त्या जागेवरील ताबा कायदेशीर संपल्याने याबाबत बेकायदेशीर शाळेला कुलूप लावल्याने गुन्हा दाखल करून वरिष्ठांना अहवाल कळवन अपेक्षित होते यास जबाबदार तेथील शिक्षक विस्ताराधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांनी कर्तव्यात कसूर केली असल्याने तातडीने निलंबन करण्यात येईल तसा प्रस्ताव शिक्षण मंत्र्याकडे पाठवला जाईल.

भास्कर पाटील (प्राथ.शिक्षणाधिकारी अहिल्यानगर)

---

## श्रीजय लोणीकर यांची एनएमएसमध्ये निवड

जालना। प्रतिनिधी

देशभरातून ९४ वा गुणवत्ता क्रमांक श्रीजय लोणीकर यांची एनएमएस मध्ये निवड आ. बबनराव लोणीकर यांचे सुपुत्र श्रीजय बबनराव लोणीकर यांनी आपल्या गुणवत्तेच्या बळावर राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे, मुंबई येथे झालेल्या ब्रँडिंग ॲड ऍडव्हर्टायझिंग प्रवेश परीक्षेत देशभरातील सुमारे दोन लाख विद्यार्थ्यांमधून ९४ वा गुणवत्ता क्रमांक मिळवत त्यांनी यशाची नवी उंची गाठली.

या उल्लेखनीय यशाच्या जोरावर श्रीजय लोणीकर यांची भारतातील नामांकित शैक्षणिक संस्था एस. व्ही. के. एम.ची नरसी मोनजी इस्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, मुंबई येथे बॅचलर ऑफ बिझनेस ऍडमिनिस्ट्रेशन या अभ्यासक्रमासाठ निवड झाली आहे. श्रीजय यांनी वैद्यकीय क्षेत्राऐवजी स्वतःच्या आवडीप्रमाणे व्यवसाय व्यवस्थापन, ब्रेंडिंग आणि उद्योजकतेचे क्षेत्र निवडण्याचा निर्णय घेतला आहे. भविष्यात एक यशस्वी उद्योजक बनण्याचे त्यांचे ध्येय असून त्यासाठी त्यांनी ही वाट निवडली आहे. श्रीजय यांच्या या यशामुळे लोणीकर परिवारासह मित्रपरिवार, शिक्षकवर्ग. त्यांच्या या यशाबाद्दल विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून अनेक विद्यार्थ्यासाठी त्यांचे यश प्रेरणादायी ठरत आहे. आ.बबनराव लोणीकर यांचे सुपुत्र श्रीजय बबनराव लोणीकर यांनी आपल्या गुणवत्तेच्या बळावर राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे, या उल्लेखनीय यशाच्या जोरावर श्रीजय लोणीकर यांची भारतातील नामांकित शैक्षणिक संस्था एस. व्ही. के. एम.ची नरसी मोनजी इस्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, मुंबई येथे बॅचलर ऑफ बिझनेस ऍडमिनिस्ट्रेशन या अभ्यासक्रमासाठ निवड झाली आहे.

---

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती निमित्त अभिवादन



जालना । प्रतिनिधी

सामाजिक समतेचे अग्रदूत, लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती निमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प हार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी नायब तहसिलदार सतिश तायडे, योगेश वाघ, सहायक महसूल अधिकारी सुहास देशमुख, रवी मगरे, सुनिल काळुंखे, राहूल साळवे, अनिल वाघमारे आदी कर्मचारी उपस्थित होते.

---

## अश्लील व्हिडीओ बनवुन लुटमार करणारी टोळी पकडली

### महिलेसह सहा आरोपींना ठोकल्या बेड्या;२ लाख ६१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

जालना। प्रतिनिधी

चंदनझिरा पोलीस ठाणे च्या हद्दीमध्ये नविन मोंढा रोडवर एका बोलेरो चालकास अडवुन त्यास त्याचेच बोलेरो गाडीमध्ये जबरदस्तीने कोंबुन ड्रायपोर्ट कडे घेवुन जावुन तेथे त्यास मारहाण करुन त्याच्या खिशातील रोख रक्कम व मोबाईल बळजबरीने हिसकावुन घेण्याची तसेच त्याचा अश्लील व्हिडीओ बनवुन त्यास नातेवाईक व मित्रांकडुन फोन पे वर पैसे घेण्यास भाग पाडुन ते पैसे स्वतःचे फोन पे वर ट्रान्सफर करुन घेण्याची घटना दिनांक २०/०६/२०२६ रोजी रात्रीच्या सुमारास घडली होती. त्याबाबत दिनांक २३/०६/२०२६ रोजी तक्रारदार यांनी तक्रार दिल्या नंतर चंदनझिरा पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल झाला होता.

मा. पोलीस अधीक्षक श्री. तेगबीरसिंह संधु व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. विक्रम साळी यांनी गुन्हयाचे गांभीर्य समजुन पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांना सदर गुन्हयाचा छडा तात्काळ लावण्याच्या सुचना दिल्या होत्या. त्यावरुन पोस्टे चंदनझिराचे एक पथक तयार करण्यात



आले. सदरचा गुन्हा सराईत व रेकॉर्डवरील गुन्हेगार सपना निकाळजे हीने तीचे साथीदारांसह केला असल्याने पथकाने तीचा शोध घेतला असता १) सपना संतोष निकाळजे वय २३ वर्षे रा. पांगरी उगले ता. सिंदखेड राजा जि. बुलढाणा ह. मु. रॉयलनगर जालना ही पळुन जात असतांना तीस पाठलाग करुन देऊळगाव राजा रोडवर पेट्रोलपंपाजवळ ताब्यात घेण्यात आले. तीचेकडुन गुन्हयातील तीचे ईतर साथीदारांची नावे निष्पन्न करुन जालना शहरातील विविध भागातुन २) अविनाश गणेश झोटे वय २६ वर्षे रा. राजपुतवाडी जालना ३) अजुर्न चमन बहादुर राजपुत वय ३४ वर्षे रा. पुष्पक नगर मंठा चौफुली जालना ४) शंकर माणिक जाधव वय २६ वर्षे रा. घनसावंगी ता. घनसावंगी जि. जालना ह. मु. लहुजी चौक नुतन वसाहत जालना ५) अतिष सतिष गायकवाड वय १९ वर्षे रा. नुतन वसाहत जालना यांना पोस्टे चंदनझिराचे पोलीस पथकाने जालना शहरात आरोपी अटक बाबत गुप्तपणे मोहीम राबवुन अवघ्या ४ तासांमध्ये बेड्या ठोकल्या व केलेल्या गंभीर गुन्हयाची उकल केली व त्यांचे कडुन गुन्हा करतांना वापरलेली ऑटो रिक्शा, मोबाईल व तक्रारकर्त्याचे लुटलेले पैसे असा एकुण २ लाख ६१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहेत. तसेच आरोपींनी गुन्हा करतांना तक्रारदार याचे फोन पे वरुन मध्यरात्री सुमारास ज्या युपीआय आयडीवर वर पैसे ट्रान्सफर केले व विड्रॉल केले ती युपीआय आयडी ६) सचिन लक्ष्मण कंठाळे वय ३२ वर्षे रा. जामवाडी ता. जि. जालना याची असल्याने त्याचा गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाले म्हणुन त्यास सुध्दा अटक करण्यात आली आहे. आरोपी सपना निकाळजे ही मुख्य सुत्रधार शातीर महीला आरोपी असुन पोलीस रेकॉर्डवरील आहे. तीच्या विरुध्द जालना व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात विविध पोलीस ठाण्यांमध्ये हनी ट्रॅपचे गुन्हे दाखल आहेत. हनी ट्रॅपच्या गुन्हयामध्ये व्यक्तीला जाळ्यात अडकवील्या नंतर त्याचे अश्लील फोटो/व्हिडीओ तयार करणे, त्यास फोटो/व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देणे व निर्जन स्थळी किंवा लॉजवर घेवुन जाणे व तेथे ईतर साथीदार यांना बोलावुन घेवुन ईसमास मारहाण करुन जबरदस्तीने लुटणे अशा प्रकारे गुन्हे करण्याची सपना निकाळजे हीची पध्दत आहे. तीने यापुर्वी करमाड पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये केलेल्या हनी ट्रॅपच्या गुन्हयामध्ये बदनामीच्या भीतीने एकाने आत्महत्या केल्याची घटना घडलेली असुन त्याबाबत गुन्हा दाखल आहे. निकाळजे ही प्रत्येक गुन्हा करतांना वेगवेगळ्या साथीदारांची टोळी तयार करुन गुन्हे करते. तीने अश्लील फोटो/व्हिडीओ तयार करुन सोशल मिडीयावर प्रसारीत करण्याची धमकी दिलेली असल्याने लुटल्या गेलेले नागरीक बदनामीच्या भीतीने तीचे विरुध्द तक्रार करत नाहीत. परंतु आता ती पोलीसांचे अटकेमध्ये असल्याने अशा प्रकारच्या घटना जिल्ह्यामध्ये कोणासोबत घडलेल्या असतील तर त्यांनी निसंकोचपणे पोलीसांचे समोर येवुन तक्रार करण्याचे अवाहन पोलीस अधीक्षक श्री. तेगबीरसिंह संधु यांनी केले आहे. सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. तेगबीरसिंह संधू , मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. विक्रम साळी , मा. उपविभागीय पोलीस अधीकारी श्री. अनंत कुलकर्णी साहेब यांचे मार्गदर्शनाखाली चंदनझिरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. बाळासाहेब पवार, व पथकाने कारवाई केली.

---

## घनसावंगी पोलिसांनी वाळूच्या पाच हायवा पकडल्या, दिड कोटीचा मुद्देमाल जप्त



जालना। प्रतिनिधी

घनसावंगी तालुक्यात अवैध वाळू उपसा करून वाळूची चोरी करणारे पाच हायवा घनसावंगी पोलिसांनी जप्त केल्या असून सुमारे दीडकोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई २५ जून रोजी करण्यात आली. घनसावंगी पोलीस ठाण्याचे ठाणे प्रमुख केतन राठोड यांच्या नेतृत्वतील पथकाने ही कारवाई केली. मिळालेल्या माहितीनुसार, घनसावंगी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक केतन राठोड यांना गोपनिय बातमीदारामार्फत घनसावंगी तालुक्यातील शिरसवाडी शिवारातील गोदावरी नदीपात्रामध्ये काही इसम हे स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी हायवा टिपरद्वारे अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुक करत असल्याची माहिती मिळाली होती.

पथकाने सदर ठिकाणी तात्काळ छापा मारुन ०५ हायवा टिपर तसेच त्यांचे चालकांना ताब्यात घेवुन त्यांना वाळु उत्खनन व वाहतुकीच्या परवाना याबाबत चौकशी केली. परंतु हायवा टिपर चालक यांच्याकडे पावती व परवाना मिळुन आला नाही. त्यामुळे सदरचे ०५ हायवा टिपर व त्यामध्ये असलेली सुमारे २५ ब्रास वाळु/रेती असा एकुण १,५१,२५,०००/- रुपये. (अक्षरी- एक कोटी, एक्कावन्न लाख, पंचवीस हजार रुपये) असा मुद्देमाल पुढील कारवाई कामी घनसावंगी पोलीस ठाण्यात आणला असुन सदर बाबत आज दिनांक २५/०६/२०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. सदरची कामगीरी ही पोलीस अधीक्षक, तेघबीर सिंग संधु, अपर पोलीस अधीक्षक, विक्रम साळी, उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग डॉ. सिध्देश्वर धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली घनसावंगी पोलीस स्टेशनचे ठाणे प्रमुख अधिकारी पोलीस निरीक्षक केतन राठोड व त्यांच्या पथकातील सपोनि. खरात, पोशि प्रकाश पवार, पोशि राधेशाम गुसिंगे, पोशि डिगंबर पोटे, पोशि कपील अडियाल, पोशि सुरेश राठोड, पोशि नवनाथ राऊत, पोशि लोखंडे यांनी केली.

# तुकाराम मुंढे यांच्या दहशतीमुळे जिल्ह्यातील ७० टक्के टपऱ्या बंद

## बाजारातून लस्सी दही पनीर गायब; उपहारगृहाची स्वच्छताही वाढली

बीड । प्रतिनिधी

आयएएस अधिकारी तुकाराम मुंडे यांची अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्त पदी नियुक्ती झाल्यानंतर भेसळ करणाऱ्यांवर प्रचंड दहशत निर्माण झाली असून बीड शहरातील गुटखा विकणाऱ्या ७० टक्के पान टपऱ्या बंद झाल्या आहेत. विविध खाद्यपदार्थांच्या दुकानातून पॅकिंगचे दही, दूध, लस्सी, पनीर ,चीज गायब झाले आहेत. याशिवाय शहरातील उपहारगृहांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी अनेक ठिकाणी जारची व्यवस्था करण्यात आली आहे. तुकाराम मुंडे यांनी घालून दिलेल्या नियमाप्रमाणे हॉटेलमध्ये आता व्यवस्था होऊ लागली आहे. एक आयुक्त काय करू शकतो? हे आता जनतेनेही पाहिले आहे. पोलिसांनी अनेक वेळा धाड मारूनही पान टपऱ्यामधील गुटखा बंद होत नव्हता मात्र केवळ तुकाराम मुंडे यांची आयुक्तपदी नियुक्ती झाल्यानंतर त्यांनी अनेक ठिकाणी ज्या कारवाया केल्या यावरून भेसळयुक्त दूधआणि गुटखा मोठ्या प्रमाणात बंद झाल्याचे चित्र दिसत आहे.

बीड जिल्ह्यातील रहिवासी असलेले अन्न औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी संपूर्ण महाराष्ट्रामध्ये आयुक्त काय असतो? हे दाखवून दिले प्रत्येकाला नियमावली घालून दिली. या नियमानुसार कुठल्या हॉटेलमध्ये किंवा खाद्यपदार्थांच्या दुकानात काम चालत नव्हते, मात्र आता प्रत्येक ठिकाणी घालून दिलेल्या




नियमाप्रमाणे काम चालू झाले आहे. विशेष म्हणजे पोलिसांना दाद न देणारे गुटखा विक्रेते दहशतवादी खाली असून बीड शहरातील ७० टक्के पान टपरी आता बंद झालेल्या दिसत आहेत. जे फक्त पान आणि इतर पदार्थ विकतात त्यांच्याच टपऱ्या चालू दिसत आहेत. बीड शहरात अनेक खाद्यपदार्थांची दुकाने आहेत, स्वीट होम ,दूध विक्रेते ,पॅकिंगचे दही, लस्सी, पनीर या बाबीही बाजारातून अचानक गायब झाल्या आहेत. याचा अर्थ हे पदार्थ भेसळयुक्त होते आणि वर्षानुवर्षे लोक खाण्यासाठी वापर करत होते ते स्पष्ट होत आहे. अनेक पदार्थां पासून बनवलेले दूध हे लहान मुलांच्या शरीरावर अधिक तीव्रतेने दुष्परिणाम करणारे असतात. हे सर्वात घातक आहे. त्यामुळे भेसळयुक्त दूध सर्वात अगोदर बंद झाले पाहिजे अशी सर्वसामान्य माणसाची भावना होती. आयुक्त मुंडे आल्यापासून यात मोठ्या प्रमाणात फरक पडला आहे. बाजारात येणाऱ्या शुद्ध दुधाला भावही चांगला मिळत आहे. शेतकरी त्यामुळे तुकाराम मुंढे यांना धन्यवाद देत आहेत. बीड शहरांमध्ये अनेक ठिकाणी दही दूध तयार होत असल्याची चर्चा होती मात्र आता हे पदार्थ बाजारातून अचानक गायब झाल्यानंतर यावर शिक्कामोर्तब झाले आहे .अनेक हॉटेलमधून अस्वच्छता, पिण्याच्या पाण्यासाठी पॅकिंगच्या बाटल्यांचा वापर मोठ्या प्रमाणात होत होता. हे पाणी पिण्यासाठी ग्राहकांवर जबरदस्ती होत होती. पिण्याच्या पाण्यासाठी स्वच्छ पाणी हॉटेलमध्ये वापरणे बंद झाले होते. मात्र तुकाराम मुंढे यांनी आदेश केल्यानंतर आता बऱ्याच उपाहारगृहांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी जार ठेवले जात आहेत. पिण्याच्या पाण्यासाठी बाटली मागितली तरच ती दिली जाते. आमच्याकडे फक्त ◀◀ पान ३ वर



### तुकाराम मुंढे यांना कायमच ठेवावे

अन्न औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांना या पदावर कायम ठेवले तर राज्यभरातील भेसळ करणारे कायमचे परागंदा होतील आणि नागरिकांना शुद्ध पदार्थ मिळतील. नागरिकांच्या जीवाशी खेळणारे हे लोक पुन्हा या व्यवसायात येणार नाहीत. यासाठी तुकाराम मुंढे यांना किमान पाच वर्षे तरी या पदावर ठेवणे गरजेचे आहे. आता त्यांना नागरिकातूनही समर्थन मिळत असून राज्यातील अनेक लोक तुकाराम मुंढे यांना हटवले तर आंदोलन करण्याच्या तयारीत आहेत.

# शाळा-महाविद्यालय परिसरातील रोड रोमिओंवर दामिनी पथकाचा दणका; ११ जणांवर कारवाई

बीड । प्रतिनिधी

शाळा आणि महाविद्यालये सुरू होताच विद्यार्थिनींना त्रास देणाऱ्या टवाळखोरांवर बीडच्या दामिनी पथकाने धडक कारवाई केली आहे. या कारवाईत एकूण ११ टवाळखोरांवर मुंबई पोलीस अधिनियम कलम ११०/११७ अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे.

दामिनी पथक प्रमुख, सहाय्यक पोलीस निरीक्षक जनाबाई सांगळे यांना उमाकिरण ट्युशन आणि आदर्श शाळा यांसारख्या परिसरांमध्ये काही तरुण मुलींना त्रास देत असल्याच्या वारंवार गोपनीय तक्रारी मिळत होत्या. या माहितीच्या आधारे दामिनी पथकाने साध्या वेशात गस्त सुरू केली. या दरम्यान, काही तरुण मुलींचा पाठलाग करताना, मोटारसायकलवरून कट मारताना किंवा अश्लील हावभाव व इशारे करताना मिळून आले.

मिळाल्या माहितीनुसार, पोलिसांनी या ११ टवाळखोरांना ताब्यात घेऊन शिवाजीनगर पोलीस ठाण्यात हजर केले. त्यांच्यावर कायदेशीर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली असून, त्यांना समज देत त्यांचे समुपदेशनही करण्यात आले आहे.

शाळा, महाविद्यालय आणि ट्युशन क्लासच्या परिसरात त्रास देणाऱ्या टवाळखोर मुलांची माहिती पोलिसांना देण्याचे आवाहन दामिनी पथकाकडून करण्यात आले आहे. नागरिक ९२२५०९२८३९ या क्रमांकावर संपर्क साधू शकतात. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत आणि अप्पर पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक जनाबाई सांगळे, सहायक फौजदार मीरा रेडेकर, पोलीस हवालदार शोभा जाधव, सविता चव्हाण आणि चालक पोलीस शिपाई संदीप गर्जे यांच्या दामिनी पथकाने पार पाडली.

# पत्रकारांना धमकी प्रकरणी खासदार संजय दिना पाटील यांच्याविरोधात कारवाईची मागणी

माजलगांव । प्रतिनिधी

मुंबईतील काही पत्रकारांना शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप असलेल्या संजय दिना पाटील यांच्याविरोधात तातडीने गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी माजलगाव येथील पत्रकारांनी केली आहे. यासंदर्भात काल दि.२६ जुन शुक्रवार रोजी माजलगाव शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, पत्रकार हे लोकशाहीचा चौथा स्तंभ असून त्यांचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य अबाधित राहणे अत्यंत आवश्यक आहे. पत्रकारांना धमकावणे, शिवीगाळ करणे आणि जीवे मारण्याच्या धमक्या देणे हा गंभीर प्रकार असून अशा घटनांमुळे पत्रकारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत आहे. खासदार संजय



दिना पाटील यांनी पत्रकारांबाबत केलेल्या कथित वक्तव्याची गंभीर दखल घेऊन त्यांच्याविरोधात पत्रकार संरक्षण कायद्यानुसार गुन्हा नोंदवून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. तसेच पत्रकारांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे संरक्षण करण्यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलावीत, अशीही मागणी करण्यात आली. दरम्यान, या प्रकरणात तातडीने कारवाई न झाल्यास माजलगांव पत्रकार संघाच्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला. या निवेदनावर पत्रकार अनंत घडसिंगे, धनंजय माने, मुजफ्फर शेख, फेरोज पठाण, विजय कापसे, मच्छिंद्र उफाडे, अजिंक्य वाघमारे आणि सिद्धेश्वर गायकवाड यांच्या स्वाक्षऱ्या असून पत्रकारांनी एकजूट दाखवत पत्रकारांच्या सुरक्षिततेसाठी कठोर भूमिका घेतली आहे.

# महाराष्ट्र गट क पूर्व परीक्षा ऑनलाईन ऐवजी पूर्वीप्रमाणेच ऑफलाईन पद्धतीनेच घेण्यात यावी

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र गट - क पूर्व परीक्षा ऑनलाईन पध्दतीने न घेता पूर्वीप्रमाणेच ऑफलाईन पध्दतीने घेण्याबाबत स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी आ.प्रकाश सोळंके यांच्याकडे मागणी केल्याने आ.प्रकाश सोळंके यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या गट क च्या परीक्षा पुर्वी प्रमाणेच ऑफलाईन पद्धतीनेच घेण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे दि २६ जुन शुक्रवार रोजी पत्राद्वारे केली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत गट क संवर्गातील स्पर्धा परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेण्याचा निर्णय घेतला आहे.त्यामुळे सदर ऑनलाईन परीक्षे दरम्यान अनेक विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणी,सर्व्हर समस्या, संगणकातील त्रुटी तसेच परीक्षा केंद्रांवरील गैरसोयींचा सामना करावा लागतो. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचे योग्य मूल्यामापन होण्यास अडथळा निर्माण होतो. तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही ऑनलाईन पध्दतीमुळे अनेक अडचणी येतात.त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना समान व न्याय संधी मिळण्यासाठी महाराष्ट्र गट-क पूर्व परीक्षा पूर्वीप्रमाणेच ऑफलाईन स्वरूपात घेण्याबाबत कार्यवाही करण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आ.प्रकाश सोळंके यांनी दि २६ जुन शुक्रवार रोजी पत्राद्वारे मागणी केली आहे.



# आष्टीत २८ जून रोजी दुग्ध उत्पादक शेतकरी मेळावा

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुका सहकारी दूध संघ मर्यादित, आष्टी आणि प्रोग्रेसिव्ह ब्रीडर फार्मर्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने "फायदेशीर दूध व्यवसाय" या विषयावर दुग्ध उत्पादक मार्गदर्शक शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा रविवार, दि. २८ जून २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत अनिषा ग्लोबल स्कूल, जामगाव रोड, आष्टी येथे होणार आहे.

या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी आ. सुरेश (अण्णा) धस हे राहणार असून, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे दुग्ध व्यवसाय तज्ज्ञ डॉ. शैलेश रामदने हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून शेतकऱ्यांना आधुनिक दुग्ध व्यवसाय, पशुपोषण, उत्पादनवाढ, खर्च कमी करण्याचे उपाय, तांत्रिक व्यवस्थापन आणि नफा वाढविण्याच्या विविध बाबींवर मार्गदर्शन करणार आहेत.

कार्यक्रमास डॉ. उपेंद्र मुंडे, सहाय्यक आयुक्त (पशुसंवर्धन) तसेच संजय साळुंखे पाटील, अध्यक्ष यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. याशिवाय राज्यातील प्रगतशील दुग्ध उत्पादक शेतकरी आपल्या यशस्वी अनुभवांचे कथन करणार असून, आधुनिक दुग्ध व्यवसायातील नाविन्यपूर्ण ◀◀ पान ३ वर

# वडवणीत पत्रकारांचा एल्गार

## खासदाराविरोधात कारवाईची मागणी

वडवणी । प्रतिनिधी

मुंबई येथे पत्रकारांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याच्या निषेधार्थ वडवणीतील पत्रकार आक्रमक झाले आहेत. आरोपी खासदार संजय दिना पाटील यांच्यावर तातडीने कायदेशीर कारवाई करावी, या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई शाखा वडवणीच्या वतीने गुरुवार, दि. २६ जून २०२६ रोजी तहसीलदार तसेच वडवणी पोलीस स्टेशन येथे निवेदन देण्यात आले.

पत्रकारांवरील वाढत्या धमक्या व अपमानास्पद वर्तनाचा तीव्र निषेध नोंदवत संघटनेने दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. पत्रकारांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे संरक्षण करणे ही शासनाची जबाबदारी असून धमकावणाऱ्यांना कायद्याचा धाक बसला पाहिजे, असे मत यावेळी अध्यक्ष ◀◀ पान ३ वर






# हिवरसिगा येथे शेतकऱ्यांना कपास बियाणे वाटप

शिरूर । प्रतिनिधी

मौ. हिवरसिगा येथील कपाशी उत्पादक गटातील सभासद शेतकरी यांना कपाशी या खरिप हगामी नगदी पीकाचे उत्पादन वाढीसाठी केंद्रशासनाच्या कपासक्राती योजनेत निवड झालेल्या शेतकरी गटासाठी मा. जिल्हा अधीक्षक कृषी अधिक्षक श्री.सुभाषजी साळवे साहेब व मा. श्री. अमृत गांगर्डे तालुका कृषी अधिकारी शिरूर कासार यांचे मार्गदर्शन खाली तसेच श्री संतोष घाशिंग मा. श्री संजय फरतडे((उपकृ. अधिकरी) तसेच सहायक श्री. जाधव संदीपान (सहा. कृषी ) यांचे



उपस्थितीत केंद्र पुरस्कृत कापूस उदत्पादकता वाढ अभियान (चउझ) योजना अंतर्गत मौजे हिवरसिंगा येथे सघन कापूस लागवड / क्लोजर लागवड पद्धती कापुस बियाणे वाटप करण्यात आले. त्या वेळी लागवडीचे अंतर कमी करून रोपांची घनता वाढववणेसघन लागवडीसाठी योग्य वाणांची निवड वाढ व्यवस्थापन, सुयोग्य अन्नद्रव्य व्यवस्थापन सघन कापूस लागवडीचे या

प्रमुख घटकांवर धनश्री शेतकरी गट, शिवक्राती शेतकरी गट, शिवज्योती शेतकरी गटातील सदस्याना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले यावेळी कार्यक्रम अध्यक्ष श्री. सुधाकर राऊत तर प्रमुख अतिथी श्री.विश्वाभर शिंदे (उपसरपंच ). शेतकरी गटाचे अध्यक्ष ज्ञानोबा शिंदे, शिवराम राऊत, प्रभाकर डोगरे, अहमद शेख,सतिश दुधाळ, राजेंद्र दुधाळ, प्रल्हाद दुधाळ ग्रामपंचायत सदस्य तसेच भिमराव सानप तटामुक्त समितीचे हे होते.शिरूर तालुक्यातील हिवरसिगा गावातील मुख्य पीक हे कपाशी आसल्याने या सदर्मातील मार्गदर्शन कार्यक्रम या निमित्ताने श्रीनिवास सार्वजनिक वाचनालय, ◀◀ पान ३ वर

# रानडुकराच्या हल्ल्यात शेतकरी जखमी

## वन विभागाने तातडीने मदत करावी, शेतकऱ्यांची मागणी

किल्ले धारूर । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील अरणवाडी येथे रानडुकराच्या हल्ल्यात एका शेतकऱ्याला गंभीर दुखापत झाल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून वन विभागाने तातडीने आर्थिक मदत देऊन वन्यप्राण्यांच्या वाढत्या उपद्रवावर नियंत्रण आणावे, अशी मागणी होत आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, अरणवाडी येथील शेतकरी भगवान मधुकर माने हे शुक्रवारी (दि. २६ जून) सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास शेतात काम करत असताना अचानक रानडुकराने त्यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात ते जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.घटनेची माहिती वन विभागाला देण्यात आली असून नुकसानभरपाई मिळण्यासाठी संबंधित शेतकऱ्याने धारूर वनपरिक्षेत्र कार्यालयाकडे अर्ज दाखल केला आहे. वन विभागाने पंचनामा करून शासन नियमानुसार तातडीने मदत मंजूर करावी, अशी मागणी शेतकरी व ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

अरणवाडीसह धारूर तालुक्यातील अनेक गावांच्या शिवारात रानडुकरांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे पिकांचे नुकसान होत असून शेतकऱ्यांच्या जीवितालाही धोका निर्माण झाला आहे. शेतात काम करताना शेतकऱ्यांना कायम भीतीच्या छायेखाली वावरावे लागत आहे.या पार्श्वभूमीवर वन विभागाने जखमी शेतकऱ्याला तातडीने उपचारासाठी आर्थिक मदत द्यावी, तसेच रानडुकरांच्या वाढत्या उपद्रवाबाबत प्रभावी उपाययोजना करून शेतकरी वर्गातील भीती दूर करावी, अशी जोरदार मागणी परिसरातील नागरिक व शेतकरी बांधवांकडून केली जात आहे.

# गुलामीमुक्त समाज निर्माण करण्यासाठी जातमुक्त व्यवस्था निर्माण झाली पाहिजे - उत्तम कांबळे

## छत्रपती राजश्री शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त समता परिषदेच्या वतीने आयोजित ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे यांचे व्याख्यान संपन्न

बीड । प्रतिनिधी

धर्म आणि जात व्यवस्थेच्या निर्मूलनासाठी महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची केले. मागासलेल्या असलेल्या महाराष्ट्राला आधुनिक महाराष्ट्र बनविण्यासाठी महात्मा ज्योतिराव फुले यांनी सर्वप्रथम प्रयत्न केले. आधुनिक महाराष्ट्राचा पाया महात्मा ज्योतिबा फुले इमारत राजर्षी छत्रपती शाहू महाराज तर कळस डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत. मागासलेल्या महाराष्ट्रातील गुलामीमुक्त समाज निर्माण करण्यासाठी जातमुक्त व्यवस्था निर्माण झाली पाहिजे यासाठी शाहू - फुले - आंबेडकर यांनी प्रयत्न केले. त्यामुळेच आजचा आधुनिक महाराष्ट्र निर्माण झाला असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे यांनी केले.

अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद बीड जिल्हा शाखेच्यावतीने क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून "छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचे आरक्षणाविषयी तत्कालीन धोरण व आजची परिस्थिती" या विषयावर ज्येष्ठ साहित्यिक उत्तमराव कांबळे (नाशिक) यांचे व्याख्यान शुक्रवार दि. २६ जून २०२६ रोजी सकाळी ११ : ३० वाजता हॉटेल नीलकमल, नगर रोड, बीड येथे संपन्न झाले. या कार्यक्रमास समता परिषदेचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष आबासाहेब खोत, सामाजिक कार्यकर्त्या प्रा. सौ. सुशिलाताई मोराळे,




साहित्यिक डॉ. सतीश साळुंके (बीड), आयोजक महात्मा फुले समता परिषदेची प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ॲड. सुभाष राऊत, परीट समाजाचे प्रदेश कार्याध्यक्ष गणेश जगताप, प्रा. लक्ष्मण गुंजाळ, समता परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष निखिल शिंदे, शहराध्यक्ष नितीन राऊत, नितीन साखरे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ॲड. सुभाष राऊत यांनी केले. यावेळी पुढे बोलताना ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे म्हणाले की, महात्मा ज्योतिबा फुले हे या देशातील पहिले क्रांतिकारी समाज सुधारक आहेत. त्यांचाच आदर्श घेऊन राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या राज्यामध्ये अनेक नवीन कायदे सुरू करून माणसाला माणसाप्रमाणे जगण्याची ताकद निर्माण करून दिली. महात्मा ज्योतिबा फुले ज्याप्रमाणे पहिले क्रांतिकारी समाज सुधारक होते त्याचप्रमाणे ते पहिले राजकीय नेते, पहिले बांधकाम व्यवसायिक, पहिले शेती तज्ञ, पहिले शिक्षण तज्ञ असे सगळे अर्थाने महात्मा ज्योतिबा फुले हे पहिले आहेत. शाहू - फुले - आंबेडकर यांचा इतिहास स्वतंत्र घेतलाच जाऊ शकत नाही. आधुनिक भारताचे शिल्पकार याच तीन महान हस्ती आहेत. राजर्षी शाहू महाराज हे जेव्हा कोल्हापूरच्या गादीवर बसले त्यावेळी राज्याभिषेक प्रसंगी त्यांनी शपथ घेतली की, "माझ्याकडे जेवढी संपत्ती आहे ती जनतेला खर्च करण्यासाठी अंबाबाई मला शक्ती देवो!" आजकालचे राज्यकर्ते मला पन्नास वर्षे राज्याचा प्रमुख असू द्या! अशी शपथ घेतात, मात्र त्याकाळी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी स्वतःचा विचार न करता जनतेचा विचार केला. शाहू महाराजांनी कायद्यासमोर सगळे समान मानून सामाजिक न्याय मिळत नाही हे जाणून घेतल्यानंतर सर्वप्रथम राखीव जागेचा कायदा केला. शिक्षणाच्या सत्तेचा कायदा केला. कोल्हापूर संस्थानात सर्व जातींसाठी स्वतंत्र वसतिगृह त्याचप्रमाणे मुली आणि महिलांसाठी स्वतंत्र वसतिगृह उभारले. आंतरजातीय विवाहाचा कायदा करून संस्थांच्या तिजोरीच्या खर्चातून सर्वप्रथम ११ आंतरजातीय विवाह लावून दिले. आई बहिणी वरून ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26